मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४६ ■ मंगळवार, ०३ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514







वैकुंठवासी ह. भ. प. सदाशिव तुकाराम नावडेकर यांच्या ४७ व्या पुण्यतिथीनिमित्त मोरबे येथे आयोजित श्री ज्ञानेश्वरी पारायण व भव्य अखंड हरिनाम उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी उपस्थित वारकरी संप्रदायातील भाविकांशी संवाद साधत कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, वारकरी मंडळी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

( दैनिक युवक आधार)

# हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

■ वृक्ष लागवड मोहिमेत स्टार्टअपचा सहभाग घ्यावा
■ रोप निर्मितीसाठी खासगी नर्सरी व बचतगटांचा सहभाग घ्यावा



**मुंबई :** पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण-३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा. स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.मराठावाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे.

# रायगड जि.प. व पं.स. निवडणुकीत भाजप महायुतीचा शक्तीप्रदर्शनात्मक बाईक रॅलीद्वारे प्रचार

## वडघर जिल्हा परिषद व करंजाडे पंचायत समितीसाठी भाजप महायुतीचा जोरदार प्रचार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी महायुतीच्या वतीने वडघर जिल्हा परिषद गट आणि करंजाडे पंचायत समिती गणाच्या प्रचारासाठी पनवेल शहरात भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



या बाईक रॅलीमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत तसेच युवा नेते आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सक्रिय सहभाग घेतला. वडघर जिल्हा परिषद गटातून भाजप महायुतीच्या वतीने उमेदवार सोनाली जितेकर, तर करंजाडे पंचायत समिती गणातून उमेदवार रंजना वास्कर निवडणूक रिंगणात असून, त्यांच्या प्रचारासाठी ही रॅली काढण्यात आली होती.

या बाईक रॅलीची सुरुवात करंजाडे शहरातील सेक्टर ५ येथील भाजप महायुतीच्या प्रचार कार्यालयातून झाली. त्यानंतर रॅलीने सेक्टर ५अ, सेक्टर ६, सेक्टर ४, सेक्टर ३, सेक्टर १, सेक्टर २, सेक्टर २अ, कॉलेज फाटा तसेच आर४ परिसरातून मार्गक्रमण केले. रॅलीदरम्यान घोषणाबाजी करत नागरिकांशी थेट संवाद साधत भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. या रॅलीला तरुण वर्गासह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने दुचाकीस्वार कार्यकर्ते सहभागी झाल्याने परिसरात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. नागरिकांनी ठिकठिकाणी रॅलीचे स्वागत करत भाजप महायुतीला पाठिंबा दर्शविला.

या प्रचार रॅलीत करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, भाजपचे ज्येष्ठ नेते कर्णा शेलार, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, पश्चिम मंडल भाजप अध्यक्ष रुपेश धुमाळ, सदाशिव वास्कर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी तसेच भाजप महायुतीचे असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खारघरची आभा सोमण आंतरराष्ट्रीय ट्रॅक एशिया २०२६ कपमध्ये चमकली

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** खारघरमधील उदयोन्मुख सायकलपटू आभा सोमण हिने चेन्नई येथे २९ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय ट्रॅक एशिया कप २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करून देशाचा अभिमान वाढवला आहे. खारघर, पनवेल येथील १७ वर्षीय आभाने उत्कृष्ट जिद्द आणि वेग दाखवत भारताचे प्रतिनिधित्व केले. तिने टीम स्प्रिंट प्रकारात सुवर्णपदक, तर वैयक्तिक २०० मीटर स्प्रिंटमध्ये रौप्यपदक पटकावले.आभा गेल्या तीन वर्षांपासून पुण्यातील फिनिक्स सायकलिंग ॲकॅडमीमध्ये प्रशिक्षक दर्शन बारगुजे यांच्या प्रशिक्षणखाली कठोर सराव करत आहे.

या आंतरराष्ट्रीय यशापूर्वी तिने विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये तिने १० राष्ट्रीय पदके जिंकून भारतीय ट्रॅक सायकलिंगमध्ये आपला ठसा उमटवला आहे. अलीकडेच चेन्नई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आभाने पुन्हा एकदा ट्रॅकवर आपली गुणवत्ता सिद्ध केली असून ती भारतातील आशादायक युवा सायकलपटूंमध्ये गणली जात आहे. तिच्या या यशामुळे नव्या पिढीतील अनेक इच्छुक खेळाडूंनाही प्रेरणा मिळत आहे.



# हवामान बदलासाठी पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचा पुढाकार

## काळा घोडा कला-महोत्सवात सादरीकरण, स्व-अभिव्यक्तीला चालना देण्यासाठी संगीत नाटक सादर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी प्रतिष्ठित 'काळा घोडा कला महोत्सवा' त परत एकदा सादरीकरणास सज्ज झाले आहेत. या वर्षी, 10 ते 13 वयोगटातील 100 हून अधिक विद्यार्थी 'द व्हिस्परिंग वूड्स ईशान्स जर्नी' नावाचे एक इंग्रजी संगीत नाटक सादर केले. आवड म्हणून निसर्गाचे निरीक्षण करणे ते त्याची सक्रियपणे जबाबदारी घेणे, असा या नाटकाचा प्रवास आहे. या अनोख्या उपक्रमाचा एक भाग म्हणून, विद्यार्थ्यांना 'पहले अक्षर फाउंडेशन' द्वारे (PAF) नेपथ्य, नाट्यकला आणि अभिनय क्षेत्रातील व्यावसायिकांसोबत काम करण्याची संधी मिळाली, ज्यामुळे त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मौल्यवान शिक्षण मिळाले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे परफॉर्मिंग आर्ट्सच्या जगाची ओळख झाली.

हे संगीत नाट्य म्हणजे 'पहले अक्षर फाउंडेशन' द्वारे (PAF) चालवल्या जाणाऱ्या एका वर्षभराच्या नाट्य-आधारित शिक्षण कार्यक्रमाचे सार आहे. भाषा विकास आणि स्व-अभिव्यक्तीसाठी ते सादरीकरणाचा एक साधन म्हणून वापर करतात. विद्यार्थ्यांनी यासंदर्भात एक आखीव अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, ज्यात संवाद कौशल्यासोबतच, आत्मविश्वासाने इंग्रजीमधील सादरीकरणाचा समावेश आहे. तसेच कथाकथन, संगीत आणि हावभावांद्वारे सर्जनशीलता जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. "नाट्यकला हे वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी एक शक्तिशाली साधन आहे, असा आमचा विश्वास आहे. विशेषतः जेव्हा भाषा शिक्षणासाठी म्हणून त्याचा उपयोग केला जातो, तेव्हा तर ती अधिकच प्रभावी असते. विद्यार्थी इंग्रजीमध्ये स्वतःला चांगल्या प्रकारे व्यक्त करायला शिकतात, त्यांची शब्दसंपदा वाढते, उच्चार सुधारतात आणि त्यांना भाषेची सखोल समज येते. यामुळे त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात अधिक आत्मविश्वास निर्माण होतो."



नारियलवाडी शाळेतील पाचवीच्या वर्गात शिकणारा शौर्य म्हणतो,"मी सहसा माझा मोकळा वेळ रोब्लॉक्स खेळण्यात घालवतो, त्यामुळेच खऱ्या रंगमंचावर उभे राहणे हे माझ्यासाठी पूर्णपणे नवीन जग होते. माझं इंग्रजी चांगलं आहे, पण अभिनयाने मला एक वेगळ्याच प्रकारचा आत्मविश्वास शिकवला. ही माझी पहिलीच वेळ असली आणि मला थोडं दडपण वाटत असलं तरी, मला भीती वाटत नाही. माझे आई-वडील मला तिथे रंगमंचावर पाहतील, अशी मला अशा आहे. कारण माझे स्वप्न अभिनेता बनण्याचे आहे, असे मला वाटते."

गेल्या वर्षीच्या नाटकाने प्रेक्षकांना प्राण्यांच्या नजरेतून निसर्ग बघायला शिकवलं होतं. तर 'द व्हिस्परिंग वूड्स' हे नाटक निसर्ग रक्षण आणि संवर्धनाच्या सक्रिय जबाबदारीवर लक्ष केंद्रित करते. जंगले आणि शहरांमधून प्रवास करताना वेगवेगळ्या गोष्टी शोधणाऱ्या ईशानच्या प्रवासातून हे नाटक आपल्यासमोर येते. रोजच्या जगण्यातल्या लहान-सहान गोष्टीतून शहरीकरणाचे परिणाम कसे कमी होऊ शकतात आणि वन्यजीवनाशी असलेले आपले नाते कसे पुन्हा प्रस्थापित होते, हे या नाटकातून आपल्या समोर येते.

# नांदेड येथे भीम योद्धा पुरस्कार २०२६ प्रदान

**दैनिक युवक आधार**

**प्रकाश गवारे :'** बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्ट, सहयोग नगर, नांदेड यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा भीम योद्धा पुरस्कार (तृतीय वर्ष – २०२६) वितरण सोहळा दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार, सहयोग नगर, नांदेड येथे सायंकाळी ५ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या हस्ते ३० भीम योद्ध्यांना सन्मानित करण्यात आले.

भीमा कोरेगाव शौर्य दिन व भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सैन्यदलातील सेवानिवृत्त सैनिक, भारतीय बौद्ध महासभेतील समता सैनिक तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या राष्ट्रीय कार्य, धम्मकार्य व सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पूज्य भिख्खु शीलरत्न थेरो यांच्या पूजापाठाने झाली. कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून आद. इंजी. अशोकराव येरेकर, स्वागताध्यक्ष आद. इंजी. विनय घनबहादूर, प्रमुख पाहुणे आद. गणपतराव गायकवाड यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले व भीम योद्ध्यांना शुभेच्छा देत बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्याचे कौतुक केले.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आद. इंजी. डी. डी. भालेराव, डॉ. वामनराव बहात्तरे, आद. ईश्वरराव जोंधळे, आद. प्रल्हादराव हिंगोले, आद. संजयराव निवडंगे, आद. रमेश दुधमल, आद. सुभाषदादा काटकांबळे, डॉ. भीमराव हाटकर, केंद्रीय शिक्षिका आद. लताताई शिंदे, आद. इंजी. भरत कानिंदे, आद. पंढरीनाथ बोकारे, आद. सुरेश गजभारे, आद. सुरेश महाबळे, आद. अशोकराव जोंधळे, आद. क्रांतीकुमार पंडित आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक तथा बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन ट्रस्टचे अध्यक्ष रमेश कोकरे यांनी केले तर आभारप्रदर्शन सचिव राजेश बिऱ्हाडे यांनी मानले.

भीम योद्धा पुरस्कार निवड समितीमध्ये आद. युवराज मोरे, आद. देवराव झगडे व आद. विजयकुमार उजेडकर यांनी काम पाहिले. कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा नांदेड उत्तर, शहर शाखा, तालुका शाखा तसेच समता सैनिक दलाचे पदाधिकारी, सैनिक व वरिष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका स्टार प्रवाह छोटे उस्ताद अंजली गडपाळे व सुप्रसिद्ध गायक सुरेश रंजवे यांच्या बुद्ध व भीम गीतांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रमेश कोकरे, उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड, सचिव राजेश बिऱ्हाडे, सहसचिव प्रवीण कुपटीकर, कोषाध्यक्ष सुभाष मल्हारे, सदस्य रमेश सूर्यवंशी, भीमराव सोनाळे, भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा नांदेडचे उपाध्यक्ष सदाशिव हनुमंत, सचिव विजय पोपलवार तसेच माता रमाई आंबेडकर महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डायनॅमिक अभ्यासिकेची यशाची परंपरा कायम...

### जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर विकास शिनगारे यांची BSF मध्ये, तर दत्ता डासाळकर यांची आरोग्य विभागात निवड

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार :** सेलू येथील डायनॅमिक अभ्यासिका ही आपली यशस्वी परंपरा कायम ठेवत आहे. यावर्षीच्या सुरुवातीलाच, नेहमीप्रमाणे जिद्द, संयम आणि अथक मेहनतीच्या जोरावर दोन विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या परीक्षांद्वारे सरकारी नोकरी मिळवून यश संपादन केले आहे.

ब्राह्मणगाव येथील विकास शिनगारे यांची SSC GD मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून BSF (सीमा सुरक्षा दल) मध्ये निवड झाली आहे. तर खुपसा येथील दत्ता डासाळकर यांची आरोग्य विभागात, लातूर येथे नियुक्ती झाली आहे.

दोघेही वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी करत उरलेल्या वेळेत अभ्यास करत होते. या प्रवासात त्यांना अनेक वेळा अपयशाला सामोरे जावे लागले; मात्र हार न मानता जिद्द व मेहनतीच्या जोरावर त्यांनी यशाला गवसणी घातली. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून, डायनॅमिक अभ्यासिकेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

अपयशाने खचून न जाता संयम राखल्यास कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होता येते, हे त्यांनी आपल्या यशातून दाखवून दिले. स्वतःवर विश्वास ठेवून प्रामाणिकपणे अभ्यास केल्यास यश नक्की मिळते, असे त्यांनी सत्कारप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.तसेच,





सेलू शहरातील सरकारी भरतीत सर्वाधिक निकाल देणारी एकमेव अभ्यासिका म्हणजे डायनॅमिक अभ्यासिका असून, त्यांच्या यशामध्ये या अभ्यासिकेचा सिंहाचा वाटा असल्याचे दोघांनीही नमूद केले.आतापर्यंत विविध परीक्षांमधून व वेगवेगळ्या शासकीय खात्यांमध्ये ६० ते ७० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सरकारी सेवेत दाखल होत आहेत. २४ तास सुरू असलेली ही सेलूतील एकमेव अभ्यासिका असून, रात्र अभ्यासिकेची सुविधा असल्याने नोकरी करत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होत आहे.

# कुटुंबिनी उरण महिला संघा'च्या अंगणात रंगला मायेचा सोहळा!

## लावणीचा ठसका आणि पैठणीचा थाट

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** नाती रक्ताच्या पलीकडची असतात आणि ती विश्वासाने जपायची असतात याचा प्रत्यय उरण मधील महिलांना अनुभवायला मिळाला. नुकताच 'बंध मायेचा, आपुलकीचा' हे ब्रीदवाक्य घेऊन चालणाऱ्या कुटुंबिनी महिला संघ उरण यांच्यावतीने आयोजित हळदीकुंकू समारंभ ३१जाने.रोजी नगरपालिका शाळेच्या मैदानावर अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम केवळ कार्यक्रम नव्हता, तर उरण मधील भगिनींसाठी तो एक आनंदाचा उत्सव ठरला. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा




उमटवणाऱ्या अनेक मान्यवर महिला उपस्थित होत्या या सर्व कर्तुत्वान महिलांचा सन्मान फुलांचे रोपटे देऊन करण्यात आला. पर्यावरणाचे रक्षण आणि आदराची हि अनोखी पध्दत सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली.

कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने उंचीवर नेले ते लावणी महाराष्ट्र सम्राट नवी मुंबई भूषण व बालगंधर्व पुरस्कार प्राप्त अशिमिक कामटे यांनी त्यांच्या लावणी नृत्याने आणि बहारदार सादरीकरणाने उपस्थित महिलांना देहभान विसरून थिरकायला लावले. तसेच जोहेब सय्यद (सलमान खान डुप्लिकेट )यांनी मनोरंजनाचा धमाका उडून दिला. दर्शना माळी यांनी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सूत्रसंचालनाने पूर्ण सोहळा एका सूत्रात बांधून ठेवला. नितेश पंडित आणि पपन पाटील यांनी 'खेळ पैठणीचा आणि सन्मान गृहलक्ष्मीचा' या माध्यमातून महिलांचे भरभरून मनोरंजन केले. आणि विजेत्यांना मानाची पैठणी बहाल करण्यात आली यासोबतच महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी खास स्टॉलची व्यवस्था करण्यात आली होती. पेडणेकर ज्वेलर्स यांनी दिलेले सौभाग्याचे वाण या सोहळ्याचे विशेष सोनेरी आठवण ठरली. त्याचप्रमाणे महिलांसाठी विविध आकर्षक बक्षीस व लकी ड्रॉ जिंकण्याची संधी देण्यात आली. तसेच कुटुंबिनी उरण महिला संघाकडून सांस्कृतिक कार्यक्रमातून महिलांना आपल्या कलागुणांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा श्लोक पाटील, संस्थापिका आरती ढोले, कार्याध्यक्षा नैना धोत्रे, यांच्या नेतृत्वात मोठी फळी उभी होती यामध्ये दीपिका माळी, वृषाली पवार, प्रियांका घरत, शुभांगी शिंदे ,निशा म्हात्रे, प्रिया मयेकर, दर्शना गावंड, कल्पना सुर्वे ,संगीता साळुंखे रिद्धी पाटील ,सविता डेरे ,रश्मी गावंड, सुप्रिया राक्षीकर, प्रशाली सावंत, विद्या पाटील सरिता म्हात्रे, स्नेहल म्हात्रे मनाली सावंत, रूपाली म्हात्रे आणि एतीक्षा अडके या सर्वांच्या परिश्रमातून हा मायेचा सोहळा सफल संपूर्ण झाला.

## भंडारी समाजाच्या महिलांचा हळदी-कुंकू समारंभ उत्साहात

### नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार व 'खेळ पैठणीचा' कार्यक्रमाचे आकर्षण

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** अखंड भंडारी समाज सेवा संघ श्रीवर्धन–म्हसळा यांच्या श्रीवर्धन शहर विभागीय कमिटीच्या वतीने श्रीवर्धन शहरातील भंडारी समाजाच्या महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ कसबा भंडारी समाज मंदिर, श्रीवर्धन येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमानिमित्त श्रीवर्धन शहरातील भंडारी समाजातील नवनिर्वाचित नगरसेवक आणि



समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती यांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि आनंदी वातावरणामुळे संपूर्ण कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.

या वेळी अखंड भंडारी समाजाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, तसेच श्रीवर्धन दांडा भंडारी समाज व महिला मंडळ, कसबापेठ भंडारी समाज व महिला मंडळ आणि नवीपेठ भंडारी समाज व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भंडारी समाजाची थोडक्यात ओळख**

भंडारी समाज हा कोकणातील एक प्राचीन, कष्टकरी व स्वाभिमानी समाज म्हणून ओळखला जातो. सामाजिक एकता, सांस्कृतिक परंपरा, महिलांचा सन्मान व शिक्षणाला प्राधान्य ही भंडारी समाजाची वैशिष्ट्ये आहेत. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अखंड भंडारी समाज सेवा संघ विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवत आहे.सदर कार्यक्रमातून समाजातील महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## वालूर विकास आघाडीमुळे जिल्हा परिषद वालूर सर्कलच्या अपक्ष उमेदवार सौ. माधुरी राम पाटील यांना बळ

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार :** वालूर जिल्हा परिषद सर्कलच्या अपक्ष उमेदवार सौ. माधुरी राम पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे वालूर गणाचे उमेदवार श्री. ज्ञानेश्वर रोकडे यांना वालूर विकास आघाडीमुळे मोठी ताकद मिळाली आहे.

वालूर विकास आघाडीचे प्रमुख नेते चंद्रकांत आबा चौधरी, इस्माईल सेठ अन्सारी यांच्यासह लिंबाजी कलाल, सतीश कलाल, धारोजी धाबे, दादामिया कुरेशी, वाहेद खान पठाण, अझहर खान पठाण आदी कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवार सौ. माधुरी राम पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. या पाठिंब्यामुळे अपक्ष उमेदवाराचे पारडे जड झाले असून, वालूर व परिसरात अनुकूल वातावरण निर्माण झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे.



आज वालूर येथे अपक्ष उमेदवार सौ. माधुरी राम पाटील व श्री. ज्ञानेश्वर रोकडे यांनी घरोघरी जाऊन प्रचार करत मतदारांकडून आशीर्वाद घेतले. या वेळी बालाजी हरकळ, पांडुरंग रोकडे, विश्वनाथ रोकडे, सलीम खान पठाण, सुभाष भालेराव, अच्युत ठोके, राजू चोरमले, बाबासाहेब खरबे, अयान शेख, बबलू पठाण, यशवंत सरगर, मारुती कोरडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

## कु.राजलक्ष्मी जगताप राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर येथील श्री वर्धमान विदयालय व कनिष्ठ महाविद्यालयची विध्यार्थीनी कु राजलक्ष्मी हनुमंत जगताप हिने पुणे ज़िल्हा अथॅलेटिक्स असोसिएशन पुणे मार्फत झालेल्या सब जुनिअर अथॅलेटिक चॅम्पियनशिप 2026 गोळा फेक स्पर्धेत (8.64 मिटर) सलग दुसऱ्या वर्षी मेडल मिळवल्याबद्दल




तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे या स्पर्धेत पुण्यासह शहरी भागातून अनेक मोठ मोठ्या इंग्लिश मिडीयम स्कूलच्या माध्यमातून विध्यार्थ्यांनी भाग घेतला होता कु.राजलक्ष्मी हनुमंत जगताप हिने इंदापूर तालुक्यातून एकमेव पदक मिळवले असून ही ग्रामीण भागातून सराव करून शहरातील मुलांबरोबर स्पर्धा करणे खूप अवघड असताना पदक मिळवल्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य,शिक्षक, व इतर कर्मचारी यांच्यकडून तीचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले.

## निंबायती गणात परिवर्तनाची लाट; शिवसेना उमेदवार सौ सविताताई सोपान गव्हाडे पाटील यांना गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** निंबायती गणातील निंबायती गाव, निंबायती तांडा, न्हावी तांडा, बहुलखेडा,कवली तिखी,ऊंबरवेढा, निमखेडी,नांदगाव तांडा,बोरमाळ तांडा, वाकडी,पहुरी आदी गावांमध्ये सध्या राजकीय वातावरण तापले असून शिवसेनेच्या उमेदवार सौ.सविताताई सोपान गव्हाडे पाटील यांना मतदारांचा उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.मागील पाच वर्षांच्या कार्यकाळात एकही ठोस विकासकाम न झाल्याची तीव्र नाराजी नागरिकांमध्ये दिसून येत असून,"एक तरी काम दाखवा" असा थेट सवाल मतदारांकडून उपस्थित केला जात आहे.याच पार्श्वभूमीवर यावेळी बदल होणारच,असा ठाम विश्वास मतदार खुलेपणाने व्यक्त करत आहेत.

मराठा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मागील पंधरा वर्षांपासून निंबायती गणात सातत्याने समाजसेवेची कामे सुरू असून, गरजू नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. मराठा प्रतिष्ठानचे संपादक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे पाटील हे स्वतः



गणातील प्रत्येक मतदारांच्या भेटीगाठी घेत असून, थेट संवाद व संपर्कावर भर देत आहेत. त्यांच्या या कार्याची पावतीच आज मतदार देत असल्याचे चित्र आहे.

गावोगावी होत असलेल्या बैठका,प्रत्यक्ष संवाद आणि विकासाचा स्पष्ट अजेंडा यामुळे शिवसेना उमेदवार सविताताई सोपान गव्हाडे पाटील यांच्याबाबत जनतेत विश्वास निर्माण झाला आहे. निंबायती गणात यावेळी निश्चितच परिवर्तन होईल,असा सूर सर्वसामान्य नागरिक,महिला आणि युवकांमधून उमटत आहे.

# संत रविदास महाराज जयंतीनिमित्त पाटणी चौकात मानवतेचा महाप्रसाद!

## संत रोहिदास नगर युवा मंच, देवपेठ यांच्या पुढाकाराने सामाजिक समतेचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** संत रोहिदास नगर युवा मंच, देवपेठ व राष्ट्रीय चर्मकार महासंघ, वाशिम जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने संत रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त वाशिम येथील पाटणी चौकात भव्य महाप्रसाद (खिचडी) वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत रविदास महाराज यांच्या समता, मानवता व बंधुभावाच्या विचारांचा गौरव केला.

या सामाजिक उपक्रमाला युवा




नगरसेवक राहुल भाऊ तूपसांडे यांनी विशेष पाठिंबा दिला. युवकांमध्ये सामाजिक भान जागृत करणाऱ्या अशा कार्यक्रमांची नितांत गरज असून संत रविदास महाराजांचे विचार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहेत, असे त्यांनी सांगितले.

तसेच शिवसेना (उबाठा) जिल्हा समन्वयक व नावाजलेले हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी संत रविदास महाराजांच्या विचारांचा आरोग्य, समाज व मानवतेशी असलेला संबंध अधोरेखित केला. "समतेचा विचार केवळ तत्वज्ञानापुरता न राहता प्रत्यक्ष आचरणात आणला पाहिजे," असे मत त्यांनी व्यक्त केले.या प्रसंगी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रामभाऊ ढेंगडे, राष्ट्रीय चर्मकार कर्मचारी संघाचे युवा जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ खंडारे, नगरसेविका मायाताई वाघमारे, रूपालीताई देशमुख, शंकर देशमुख, आकाश राठी, युवा सामाजिक कार्यकर्ते प्रदिप पट्टेबहादूर आदी मान्यवर उपस्थित होते.

संत रविदास महाराजांनी जात-पात, उंच-नीच व अस्पृश्यतेला ठाम विरोध केला. "सर्व माणसे समान आहेत व मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही," हा संदेश त्यांनी समाजाला दिला. दलित, वंचित व श्रमिक समाजाला आत्मसन्मान मिळावा यासाठी त्यांनी समाजप्रबोधन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आकाश राठी, प्रकाश चेंदरे, राम इंगळे, अशोक पिंपळे, योगेश राठी, ओम पिंपळे, सागर महाले, गोपाल चराटे, सुभाष पहारे, गणेश राठी, शिवा पहारे, रामेश्वर चराटे, गोविंद राऊत, संतोष राठी व रामेश्वर खंदारे यांनी विशेष परिश्रम घेतले.महाप्रसाद वाटपाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, हा उपक्रम सामाजिक एकतेचे उत्तम उदाहरण ठरला.

## सिल्लोड येथे 'क्रांती मागासवर्गीय महिला बचत गटा'तर्फे संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती संपन्न

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** क्रांती मागासवर्गीय महिला बचत गटाच्या वतीने समाजसुधारक, समतेचे व मानवतेचे प्रणेते संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती अत्यंत साध्या आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. महिलांनी सामाजिक परिवर्तनासाठी संघटित होण्याचा संकल्प करणे, हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि सामूहिक अभिवादनाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वक्त्यांनी संत रोहिदास महाराजांच्या समता, बंधुता




आणि सामाजिक न्यायाच्या विचारांवर प्रकाश टाकला. महाराजांचे विचार आजच्या आधुनिक काळातही समाजासाठी दिशादर्शक असून, विशेषतः महिलांनी संघटित होऊन स्वतःच्या प्रगतीसोबतच सामाजिक बदलासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती द्वारका अशोक गायकवाड होत्या. यावेळी अश्विनी पंगारे, रंजना गायकवाड, भारती बेदवे, क्रांती गायकवाड यांच्यासह बचत गटाच्या इतर सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नेटके आयोजन क्रांती मागासवर्गीय महिला बचत गटाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व महिलांनी संत रोहिदास महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत वाटचाल करण्याचा मनोदय व्यक्त केला.

# शेकाप उत्तर भारतीय सेलच्या पनवेल तालुका अध्यक्षा ममता जैसवाल यांचा शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** शेकापक्षाला लागलेली घरघर थांबायचे नाव घेत नाही तोच शेकापला आणखी एक झटका मिळाला आहे. शेकाप पुरस्कृत उत्तर भारतीय सेलच्या पनवेल तालुका महिला अध्यक्षा ममता जैसवाल यांनी शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. सुकापूर येथे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश संपन्न झाला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर भारतीय समाजाचे नेते संतोष शर्मा, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सरपंच ज्योती केणी, उपसरपंच दिवेश भगत, माजी सरपंच योगिता पाटील, आलूराम केणी, पांडुरंग केणी, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, चंद्रकांत पोपेटा, अशोक पाटील, उदय म्हसकर, राजेश पाटील, योगेश पाटील, राहुल पोपेटा, महेश केणी, हनुमान खुटले, शशिकांत पाटील, विभागीय अश्यक्ष ज्ञानेश्वर पाटील,



रविंद्र केणी, सादिक शेख, उषा पाटील, उज्वला म्हसकर यांच्यासह स्थानिक नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ममता जैस्वाल आणि सहकाऱ्यांच्या प्रवेशामुळे पनवेल तालुक्यात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, असा विश्वास यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

उत्तर भारतीय सेलच्या पनवेल तालुका महिला अध्यक्षा ममता जैसवाल यांच्या समवेत अभिषेक यादव, विवेक यादव, ज्योतिषलाल यादव, संगीता यादव, रजनीश सिंह, रिता वर्मा, वंदना वर्मा, रेणू यादव, संगिता वर्मा, रेणू वर्मा, सुभावती वर्मा, रिमा ताऊर, रेखा गौतम, रूपा गौतम, संजू सिंह, वर्षा कोरी, अर्चना विश्वकर्मा, कृतू जशावन, शिम्पी गुप्ता, निशा चौहान, रितू शिवधन, संगिता सोनी, रिंकी पांडे, खुशबू गुप्ता, संजना गुप्ता, स्वाती कामबडे, पूनम विश्वकर्मा, सुभाती देवी, चंद्रज्योती, संगिता मोर्या, पूनम वर्मा, चिंता शर्मा, नीलम विश्वकर्मा, पूनम शुक्ला, साधना शुक्ला, रुची सिंह, बिंदू राय, मीरा शर्मा, शितल शर्मा, अंजली वर्मा, निशा गुप्ता, आशा सिंह, उषा जैस्वाल, सुशीला चौहान, संगीता यादव, मनिषा चौहान, रिता विश्वकर्मा, सुषमा चौहान, सुनीता शर्मा, संध्या शर्मा, सुमन पांडे, अमृता पांडे, साधना शुक्ला, राघिनी पांडे, सुसुम शर्मा, मृदुला शर्मा, पूनम शुक्ला, रंजन सिंह, गायत्री मिश्रा, रुची तोमर, सरिता सिंह, आरती राजभट, पुष्पा गुप्ता, सुनीता यादव, रेणू गुप्ता, प्रिया गुप्ता, ज्योती गुप्ता, कंचन तिवारी, आरती तिवारी, रूपा परम, कुसुम मोर्या, मिथलेश देवी, मीरा सिंह, पूनम मोर्या, पूनम कनोजिया, जया देवी, शांती शर्मा, खैरू सिंह, कुसुम वर्मा, फुलमती विश्वकर्मा, ममता अरविंद गुप्ता, सोनबादशाह, अनिता जैसवाल, आपण म्हात्रे, मंता गौरी, वंदना तारडे, मीरा दुबे, आशा शर्मा, सरिता पांडे, सुनीता सिंह, अंजु शर्मा, प्रणिती कोलकर यांच्यासह अनेक समर्थकांनी भाटिया जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

## संत सेवालाल महाराज जयंतीच्या औचित्याने बंजाराबांधवांची आढावा बैठक

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर :** थोर समाजसुधारक तथा बंजारा समाजाचे आराध्य दैवत जगद्गुरू संत सेवालाल महाराज यांच्या १५ फेब्रुवारी रोजी पार पडणाऱ्या जयंतीच्या औचित्याने श्री संत सेवालाल महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने बंजारा समाज बांधवांची आढावा बैठक दि. १ फेब्रुवारी रोजी दिग्रस शहरातील कान्होबा पेट्रोल पंपासमोरील चाय- चस्का हॉटेलच्या हॉलमध्ये संपन्न झाली. या बैठकीत येणाऱ्या जयंती उत्सवाचे नियोजन, कार्यक्रमांची रूपरेषा तसेच समाजासमोरील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या विचारांचा समाजात प्रचार व प्रसार करण्यावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्याबाबत एकमत झाले. जयंती उत्सव शांततेत, उत्साहात



व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. बैठकीत समाजातील युवकांनी संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, समाजाच्या प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. शिवाय समाजातील विकासात्मक प्रश्नांवरही चर्चा झाली. या आढावा बैठकीस समाजातील ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.


## डी. बी. म्हात्रेंच्या खोट्या प्रचाराचा भांडाफोड; संस्थापक पै. रुपेश पावशे यांचा खुलासा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल तालुक्यातील नितळस गावात उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराज आणि लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुल आपणच बांधल्याचा खोटा प्रचार शेतकरी कामगार पक्षाचे नेते डी. बी. म्हात्रे करत असल्याचा गंभीर आरोप या संकुलाचे संस्थापक अध्यक्ष व प्रशिक्षक पै. रुपेश पावशे यांनी केला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी व शेतकरी कामगार पक्षाकडून मतदारांची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

पै. रुपेश पावशे यांनी स्पष्ट केले की, या कुस्ती संकुलाच्या उभारणीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतःच्या खिशातून सुमारे २३ लाख रुपयांचा खर्च केला आहे. तसेच या संकुलाची मासिक देखभाल पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर हे दरमहा ३० ते ४० हजार रुपये स्वखर्चाने करत आहेत. असे असतानाही या संकुलाचे श्रेय घेण्याच्या नादात डी. बी. म्हात्रे खोटी माहिती पसरवत असल्याचे त्यांनी सांगितले.ते म्हणाले की, पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली असून अनेक कामे त्यांनी पुढाकाराने व स्वखर्चाने केली आहेत. त्याच अनुषंगाने नितळस गावात नवोदित व होतकरू कुस्तीपटूंकरिता छत्रपती संभाजी महाराज व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सुसज्ज, राष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल उभारण्यात आले आहे.

या संकुलाच्या उभारणीच्या वेळी डी. बी. म्हात्रे यांनी केवळ पाच ते सहा लाख




रुपयांची मदत केली होती. उर्वरित खर्चासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे जाण्याचा सल्ला स्वतः डी. बी. म्हात्रे यांनी दिला होता, असेही पावशे यांनी सांगितले. त्यानंतर लगेचच आम्ही आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन संकुलाचा प्रस्ताव मांडला असता त्यांनी त्वरित होकार देत २३ लाख रुपयांचा स्वखर्च करून संकुल उभारले, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र निवडणुका जवळ आल्याने या कुस्ती संकुलाच्या नावावर मते मिळवण्यासाठी डी. बी. म्हात्रे जाणीवपूर्वक खोटी माहिती पसरवत असून 'हे संकुल मीच बांधले' असा दावा करत फिरत आहेत. प्रत्यक्षात या संकुलाच्या उभारणीत आमदार प्रशांत ठाकूर यांचा मोठा वाटा असून त्यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करून केलेला हा प्रचार पूर्णतः दिशाभूल करणारा आहे, असे पै. रुपेश पावशे यांनी ठामपणे सांगितले. पै. रुपेश पावशे यांनी केलेल्या या खुलाशामुळे डी. बी. म्हात्रे यांचा दावा पूर्णपणे फोल ठरला असून त्यांच्या खोट्या प्रचाराचा पर्दाफाश झाला आहे.

## राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धामध्ये नाशिक संघाला प्रथम पारितोषिक; वेद जाधव उत्कृष्ट फलंदाज पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी/विलास गायकवाड/नाशिक :** टेनिस क्रिकेट असोशिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित राज्यस्तरीय सहावी चौदा वर्षे आतील अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी नाशिक येथील मोदी क्रीडा मैदानावर उत्साह संपन्न झाली यामध्ये प्रथम क्रमांक नाशिक ,द्वितीय क्रमांक सातारा,तृतीय क्रमांक धुळे व चौथा क्रमांक सोलापूर जिल्हा यांनी मिळवल्याबद्दल त्यांचे राज्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ .मिनाक्षी गिरी व महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, सहसचिव चंद्रकांत तोरणे , महिला अध्यक्षा धनश्री गिरी,जिल्हा सचिव विलास गायकवाड, धुळे जिल्हा सचिव संदीप शिंदे ,नंदुरबार जिल्हा सचिव संदीप खलाणे,

जळगाव जिल्हा सचिव खुशाल देशमुख संभाजीनगर जिल्हा सचिव




शफिक शेख सांगली जिल्हा खजिनदार स्वप्निल सुर्वे ,ठाणे जिल्हा सहसचिव महेश मिश्रा ,मुंबई उपनगर सचिव संदीप पाटील ,रायगड जिल्हा सचिव स्वप्निल सर, अमरावती जिल्हा सचिव नितीन सराफ,इत्यादी व क्रीडाप्रेमी उपस्थित होते

यावेळी राज्यतून एकूण 24 संघांनी सहभाग नोंदवला तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन महासचिव सौ मिनाक्षी गिरी यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल माहिती व नियम सांगितले

राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये एकूण 24 संघानी सहभाग घेतला. पहिल्यांदी सर्व संघ साखळी पद्धतीने खेळवण्यात आल्या साखळी पद्धत तुन एकूण 16 संघ क्वालिफाय झाले त्यानंतर कॉटर फायनल साठी आठ संघ ,सेमी फायनल साठी चार संघ ,त्यामध्ये नाशिक ,धुळे ,सोलापूर आणि सातारा सेमी फायनल साठी क्वालिफाय झाले. 14 वर्षे आतील स्पर्धेचा अंतिम सामना नाशिक विरुद्ध सातारा यांच्यात होऊन नाशिक संघाने उत्कृष्ट खेळ करत या स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त केले तसेच द्वितीय क्रमांक सातारा,तृतीय क्रमांक धुळे व चतुर्थ क्रमांक सोलापूरतसेच बेस्ट बॅट्समन- वेद जाधव नाशिकमालिकावीर /-मिहीर काटकर (सातारा ) उत्कृष्ट गोलंदाज /-लंबोदर निकम (सातारा ) यांना मिळवल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्ष कन्हैया गुजर व महासचिव मीनाक्षी गिरी , महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी , महिला अध्यक्ष धनश्री गिरी,नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी अभिनंदन केलेया स्पर्धेमध्ये सोमा बिरादार,सत्यम पांडेमहेंद्र देशमुख,धनश्री गीरी,धनजय लोखडे,जगदीश मोरे,कृष्णा पाटील,शुभम जगतापप्रशांत गुंजाल,रोहीणी सकटे पुजा सुर्यवंशी,संदीप पाटील,मानस पाटील,मयूर कोष्टी देवेंद्र बाशुल यांनी पंच म्हणून काम पार पाडले.. राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा राजस्थान. येथे होत आहे या स्पर्धेत महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई संघ सहभागी होणार आहे.

## गार्डन हिल्स इंग्लिश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठया उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**विजय खुडे/तालुका प्रतिनिधी :** कळमनुरी येथील गार्डन हिल्स इंग्लिश स्कूल कळमनुरी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम ' २०२६' अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचीच्या सुरवात दीपप्रज्वलन करून केली.

विविध गुणदर्शन: लहान गटातील मुलांनी 'नृत्यनाटिका' सादर केली, प्रबोधनात्मक पथनाट्य कलाविष्कार: कोळीगीत अनेक गाण्याने कार्यक्रमात रंगत आणली. तसेच, विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या डान्स साठी प्रेक्षकांनी




भरभरून साथ दिली.पालकांनी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या मेहनतीचे कौतुक केले. कार्यक्रमाची उदघाटन प्रसंगी श्री मनपत स्वामी नांदेड कर हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्रसंगी श्री भारत थळपते सर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यपिका सिंधुताई कांबळे मॅडम व सिद्धार्थ पाईकराव सर यांनी केले व कार्यक्रमाचे आभार श्री भारत थलपते सर यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शरद सुरसे अरुण शिंदे

मीनाक्षी धुळे, प्रतीक्षा चव्हाण राणी सुडके रोहिणी कीर्तने डाखोरे मॅडम पूजा थळपते संगीता जाधव.राहुल घोंगडे.सदप मॅडम उषा भारत थळपते. पदमे मॅडम सौरभ साखरे सर्वांनी सहकार्य केले

## चैनपूर येथे आ.जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे :** देगलूर(दि.०३) चैनपूर ता.देगलूर येथील ग्रामविकासाला गती देणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. गावातील अंतर्गत सी.सी. रस्ते,पथदिवे उभारणी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती या महत्त्वाच्या ९० लक्ष रु.निधिच्या कामांचा भूमिपुजन यावेळी करण्यात आला.

गावकऱ्यांच्या मूलभूत व पायाभूत सुविधांसाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे आ. जितेश अंतापूरकर यांनी यावेळी सांगितले.विकासकामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत



यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल,असेही त्यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमास परिसरातील प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान,आ.अंतापूरकर यांनी गावातील हरीनाम व शिवनाम सप्ताहास भेट देत भजनी मंडळ व ग्रामस्थांसोबत हरिनामाच्या गजरात सहभागी होत भक्तिरसात तल्लीन झाले. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.यानंतर शहापूर येथून पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडींचे दर्शन त्यांनी घेतले. तसेच शेळगाव नृसिंह येथे आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा लाभ घेत वारकऱ्यांशी संवाद साधला. विकासकामांसोबतच सामाजिक व धार्मिक उपक्रमांना दिलेले प्रोत्साहन हे लोकप्रतिनिधी म्हणून आ. अंतापूरकर यांचे संवेदनशील नेतृत्व दर्शवते,अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या भुमिपुजन कार्यक्रमाचे आयोजक भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी उपसरपंच मारोतीराव हनेगावे व सरपंच प्रदीप वाघमारे यांनी केले तर यावेळी नांदेड जिल्हा परिषदेकडून माजी शिक्षण सभापती माधवराव मिसाळे सर,मा.जि.प.सदस्य अनिल पाटील खानापूरकर,तसेच भाजपा नेते ताराकांत पाटिल नरंगलकर, हाणमंत डोपेवाड,रमेश पाटील वनाळीकर,तुकाराम कोकणे, सुरेश अना नावेकर,बुथ अध्यक्ष राजू ईबितदार,नामदेव कायतवाड,पापना दंडलवाड, संजय नामपले,प्रशांत बोरवाड, विठ्ठल देशमुख,राम पाटील, हाणमंत हनेगावे आणि गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.

## राज्यस्तरीय कीर्तन महासंमेलनात पिंपळा येथील माऊली ज्ञानेश्वर चौधरी पाटील यांचे विशेष आमंत्रण

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे (पिंपळा)/ वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (कारंजा घाडगे)संत लटारे महाराज मंदिर परिसर, बाजार चौक, कारंजा (घाडगे) येथे आगामी ५ व ६ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय कीर्तन महासंमेलन आयोजित केले जाणार आहे.या भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होईल. सर्व सहभागी आणि रसिकांना वेळेवर उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन आहे.

यासाठी पिंपळा येथील युवा कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर (माऊली)महाराज चौधरी पाटील यांना विशेष आमंत्रण देण्यात आले आहे.



माऊली ज्ञानेश्वर महाराज आपल्या भक्तिरसयुक्त गायनाने कार्यक्रमात उपस्थित राहणार असून, त्यांच्या सहभागामुळे महासंमेलनात नवा उत्साह निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रमात राज्यभरातील प्रतिष्ठित कीर्तनकार, भक्तजन आणि धार्मिक गुरू उपस्थित राहणार आहेत. आयोजकांनी सांगितले की, या महासंमेलनाचे उद्दिष्ट धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला साजेसा मंच उपलब्ध करून देणे आणि युवकांना कीर्तनकौशल्यात प्रोत्साहन देणे हे आहे.

सर्व भक्तांना आणि रसिकांना ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता संत लटारे महाराज मंदिर परिसर, बाजार चौक, कारंजा येथे उपस्थित राहण्याचे आग्रहाने आवाहन करण्यात आले आहे.

**पिंपळा गावाचा गौरव!**

युवा कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज चौधरी पाटील (माऊली) यांना आमंत्रित करून पिंपळा गावाने राज्यस्तरीय कीर्तन महासंमेलनात आपला ठसा ठोकला आहे. त्यांच्या भक्तिरसयुक्त गायनामुळे कार्यक्रम अधिक उत्साहवर्धक होईल आणि सर्व रसिकांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळणार आहे.

# शांततेसाठी कडक पावले, सलोख्यासाठी ठाम भूमिका!

**दैनिक युवक आधार**

**रणजीतसिंह ठाकूर/ प्रतिनिधी रिसोड :** रिसोड धार्मिक स्थळांवरील भोंग्यांमुळे वाढणारा गोंगाट, ध्वनिप्रदूषणामुळे होणारा त्रास आणि त्यामुळे बिघडू शकणारा सामाजिक समतोल यावर तोडगा काढण्यासाठी रिसोड पोलिस स्टेशन येथे शांतता समितीची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत कायदा, संवेदनशीलता आणि सामाजिक सलोखा या तिन्ही गोष्टींचा समतोल राखत पुढील दिशा ठरवण्यात आली.या बैठकीचे नेतृत्व ठाणेदार श्री. रामेश्वर चव्हाण यांनी केले. त्यांनी उपस्थितांना भावनिक आणि जबाबदार भाषेत मार्गदर्शन करत सांगितले की,"धर्म आपल्याला माणुसकी शिकवतो. पण त्याच माणुसकीला त्रास होईल असा गोंगाट आपण थांबवला पाहिजे. लहान मुले, वृद्ध, आजारी



नागरिक यांना शांततेची गरज आहे. कायद्याच्या चौकटीत राहूनच सर्वांनी आपली धार्मिक कर्तव्ये पार पाडावीत."

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंगे हटविणे बंधनकारक आहे. या नियमांची माहिती ठाणेदार चव्हाण यांनी सविस्तरपणे दिली. कोणावरही अन्याय न होता, पण कायद्याचे उल्लंघन झाल्यास कारवाई अटळ राहील, असा ठाम पण संयमित संदेश त्यांनी दिला.

बैठकीला मंदिर, मशीद, बौद्ध विहाराचे विश्वस्त, शांतता समितीचे सदस्य, पत्रकार बंधू तसेच विविध समाजघटकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखी पोलिस प्रशासनाच्या या भूमिकेचे स्वागत केले आणि सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

ठाणेदार रामेश्वर चव्हाण हे केवळ कायदा राबवणारे अधिकारी नसून, समाजाशी संवाद साधणारे, लोकांच्या भावना समजून घेणारे आणि शांततेला प्राधान्य देणारे अधिकारी म्हणून ओळखले जात आहेत. त्यांच्या सकारात्मक, संवेदनशील आणि ठाम नेतृत्वामुळे रिसोड शहरात विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. या बैठकीमुळे धार्मिक सलोखा अधिक मजबूत होणार असून, रिसोड शहर "शांततेचे शहर" म्हणून ओळखले जावे, हीच या उपक्रमामागची खरी भावना आहे.

# "हल्ले, पुनर्बांधणी आणि श्रद्धेचा इतिहास : सोमनाथ मंदिराचा संघर्षमय प्रवास"

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** सोमनाथ मंदिराचा इतिहास हा संघर्ष, पुनरुत्थान आणि स्वाभिमानाचा प्रतीक राहिला आहे. १०२६ साली गझनीच्या महमूदने सोमनाथ मंदिरावर आक्रमण करून तेथील अपार संपत्ती लुटली होती. इतिहासात तब्बल १७ वेळा हे मंदिर उद्ध्वस्त करण्यात आले, मात्र प्रत्येक वेळी ते नव्या जोमाने उभे राहिले. १०२६ मधील पहिल्या आक्रमणाला २०२६ मध्ये १००० वर्षे पूर्ण होत असून, या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ गुजरातमधील सोमनाथ मंदिरात 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या पर्वात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती लाभली होती, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते व विचारवंत माधव भांडारी यांनी केले.

श्रीवर्धन येथील सार्वजनिक वाचनालय संस्थेच्या वतीने रविवार, दि. ०१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता पेशवे आळी येथील दत्त मंदिरात "सोरटी सोमनाथ मंदिराचा इतिहास" या विषयावर माधव भांडारी यांचे व्याख्यान आयोजित




करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोज गोगटे तर उपाध्यक्ष विनय वैद्य, सहकार्यवाह कुणाल सावंत व्यासपीठावर उपस्थित होते.

व्याख्यानाच्या सुरुवातीला कोकण पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. अशोक मोडक, सेवानिवृत्त शिक्षक व सार्वजनिक वाचनालय श्रीवर्धनचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण पेंडसे तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.माधव भांडारी यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, गुजरातच्या वेरावळजवळ प्रभास पाटन येथे स्थित सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले व अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र असून ते भगवान शंकराला समर्पित आहे. अनेक आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिराचा आध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा अखंड राहिला आहे. अठराव्या शतकात उद्ध्वस्त झालेल्या सोमनाथ मंदिराच्या पुनरुज्जीवनात इंदूरच्या मराठा राणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा मोलाचा वाटा असून, १७८३ च्या सुमारास त्यांनी मूळ मंदिराजवळ नवीन मंदिर उभारले. आज ते 'अहिल्याबाई मंदिर' किंवा 'जुने सोमनाथ मंदिर' म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यानंतर सध्याचे भव्य मंदिर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकारातून उभे राहिले.

चंद्रदेव, राजा दक्ष प्रजापतीच्या सत्तावीस कन्यांशी विवाहबद्ध असूनही रोहिणीवर अधिक प्रेम केल्यामुळे दक्षाने त्याला 'क्षय' होण्याचा शाप दिला. या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने प्रभास पाटन येथे भगवान शिवाची आराधना केली. शिवशंकर प्रसन्न होऊन त्यांनी चंद्राला पूर्ण नाशापासून वाचविले व 'अमरत्व' प्रदान केले. या घटनेच्या स्मरणार्थ येथे सोमनाथ ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली आणि म्हणूनच या स्थळास 'सोमनाथ' हे नाव प्राप्त झाले, अशी महत्वपूर्ण माहितीही भांडारी यांनी दिली.यावेळी श्रीवर्धन नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड. अतुल चोगले, उपनगराध्यक्ष अनंत गुरव तसेच प्रविता माने, देवेंद्र भुसाणे, संतोष वेश्वीकर, प्रसाद विचारे, सुप्रिया चोगले, साक्षी पाब्रेकर, प्रणिल बोरकर, शमा वैद्य, हरिदास वाघे, प्रगती वाघे, सलोनी मोहित, शिवानी चौले, इफ्तिखार राजपुरकर, शबिस्ता सरखोत, समीर साठविलकर, गुलाब मांडवकर, रूची बोरकर व रेहमत आराई या नगरसेवकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन पद्मजा कुळकर्णी यांनी केले, प्रास्ताविक कार्यवाह गणेश सावंत यांनी मांडले, तर आभारप्रदर्शन मनोज गोगटे यांनी केले. या व्याख्यानास श्रीवर्धनकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला."सोरटी सोमनाथ मंदिराचा इतिहास हा संघर्ष, श्रद्धा आणि स्वाभिमानाचा तेजस्वी वारसा आहे," असे मत व्यक्त करत माधव भांडारी यांनी व्याख्यानाची सांगता केली.

# बालरंगभूमी परिषद नवी मुंबई शाखेचा दिव्यांग महोत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई / प्रतिनिधी :** बालरंगभूमी परिषद, नवी मुंबई शाखेच्या वतीने रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी ऐरोली येथे दिव्यांग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रेरणादायी कार्यक्रमात नवी मुंबई परिसरातील १० शाळांनी सहभाग घेतला असून,डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशन शाळेतील १० विशेष विद्यार्थ्यांनी या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.






कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालरंगभूमीच्या अध्यक्षा सौ. निलम शिर्के सावंत उपस्थित होत्या. त्यांनी विशेष विद्यार्थ्यांचे, त्यांच्या शिक्षकांचे तसेच पालकांचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली.

डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांनी "रंगीलो मारो ढोलना" या गीतावर सादर केलेले समूह नृत्य विशेष आकर्षण ठरले. त्यांच्या सादरीकरणास प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करून भरभरून दाद दिली.

तसेच शाळेतील विद्यार्थिनी कु. अर्णवी कांबळे हिने "मेरे ढोलना सुन" या गीतावर सादर केलेल्या एकेरी नृत्याने उपस्थित मान्यवरांची मन जिंकली तिच्या उत्कृष्ट नृत्यकलेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

या प्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाळेला सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. कांतीलाल पाटील सर यांना त्यांच्या योगदानाबद्दल गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# शेटफळगढे पंचायत समिती गणात किटलीच्या प्रचाराने गरमाई वाढली

## मा.सौरभ झगडे यांच्या

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुका पंचायत समितीच्या निवडणुकीत शेटफळगढे गणात अपक्ष उमेदवार श्री.सौरभ गणेशकुमार झगडे हे किटली या चिन्हावर निवडणुक लढवत आहेत शिंदेवाडी ता.इंदापूर गावचे विद्यमान सरपंच म्हणून काम करत असून सामाजिक कामाचा परिपूर्ण अभ्यास असल्यामुळे आणि स्व.अजितदादा पवार यांचे निष्ठावंत कार्यकर्ता अशी त्यांची ओळख तालुक्यात आहे. त्यांचे वडील आहे श्री गणेशकुमार झगडे श्री छत्रपती कारखान्याचे माजी संचालक आहेत तर मातोश्री सौ मंगल गणेशकुमार झगडे या इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका आहेत त्यांच्या माध्यमातून तालुक्यातील आणि या भागातील शेतकरी नागरिक यांना पण योग्य मानसन्मान देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात त्यांनी सुद्धा या गणातील खूप सार्वजनिक कामे स्व.अजितदादा पवार यांच्यामार्फत मार्गी लावले



असल्याचे मतदार सांगत आहेत शेटफळगढे गणात त्यांच्या किटली या चिन्हाची खूप लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली असल्याची दिसत आहे नवमतदार व युवकवर्ग फार मोठया प्रमाणात जोडला जात असल्यामुळे निवडणुक सध्या तरी किटलीच्या बाजूने झुकत चालली असल्याची चर्चा गावागावात सुरु आहे.

# "युवा शक्तीचा सामाजिक वारसा: विकास महाविद्यालयात ५११ बाटल्या रक्त संकलन"

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** विद्या विकास एज्युकेशन सोसायटी संचलित विकास कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, विक्रोळी (पूर्व) येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटच्या वतीने दिवंगत कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ५११ बाटल्या रक्ताचे संकलन केले.




या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. विकास राऊत यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय वैद्यकीय संघटनेचे सचिव डॉ. संकेत दोशी आणि विशेष अतिथी म्हणून डॉ. हरीश पांचाळ उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून सामाजिक कार्यासाठी रक्तदानाचे महत्त्व विषद केले.

शिबिरामध्ये संकलित झालेले रक्त गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्यासाठी महानगर पालिकेची शताब्दी रुग्णालय रक्तपेढी आणि संकल्प रक्तपेढीसह अन्य प्रमुख रक्तपेढ्यांनी तांत्रिक सहकार्य व योगदान दिले. या उपक्रमाला स्थानिक माजी नगरसेवक श्री. उपेंद्र सावंत आणि मुंबई शिक्षक आमदार श्री. ज. मो. अभ्यंकर यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहित केले.

संस्थेचे सचिव डॉ. विनय राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनघा राऊत, महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती सी. विन्स, विकास ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ. वैष्णवी राऊत, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. संभाजी इंगळे, प्रा. विनायक मुळे आणि उपप्राचार्य प्रा. शाजी मॅथ्यू यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरासाठी विकास ज्युनिअर कॉलेज चे एन.एस.एस. युनिट, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ माहिती केंद्र यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# ब्ल्यू फ्लॅग नामांकन धोक्यात? श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर नियमांची अंमलबजावणी कागदावरच!

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि सुरक्षित समुद्रकिनारा म्हणून जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणारे ब्ल्यू फ्लॅग नामांकन श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला मिळाले असले, तरी त्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या नियमांची ठोस अंमलबजावणी प्रशासनाकडून होत नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.



ब्ल्यू फ्लॅग मानांकनासाठी अत्यावश्यक असलेली समुद्रकिनारी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, पर्यटकांसाठी सुरक्षितता, तसेच किनाऱ्यावरील अस्थापनांवर कडक नियमावली याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींमधून केला जात आहे.

विशेषतः समुद्रकिनाऱ्यावरील घोडा व्यवसायामुळे निर्माण होणारी अस्वच्छता ही मोठी समस्या ठरत आहे. घोड्यांची विष्ठा थेट वाळूवर पडत असून, यामुळे दुर्गंधी, आरोग्याच्या समस्या आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र, या गंभीर बाबीकडे संबंधित विभागांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे.

याशिवाय, किनाऱ्यावर उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या अस्थापनांबाबत नियमांचे उल्लंघन, कचऱ्याची योग्य विल्हेवाट नसणे, तसेच पर्यावरणपूरक व्यवस्थापनाचा अभाव स्पष्टपणे जाणवत आहे. हे सर्व प्रकार ब्ल्यू फ्लॅगच्या निकषांना थेट छेद देणारे आहेत.

जर अशीच उदासीनता कायम राहिली, तर श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याचे ब्ल्यू फ्लॅग नामांकन धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून नियमांची कडक अंमलबजावणी करावी, अन्यथा हा केवळ कागदोपत्री सन्मान ठरेल, असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

# दोन हाणा पण पुढारी म्हणा!; निंबायती गणात जुन्या कारभाराविरोधात संताप"

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे :** तालुक्यात आमखेडा जिल्हा परिषद व गण असुन तसेच निंबायती पंचायत समिती गणात मागील अनेक वर्षांपासून सत्तेवर असलेल्या पुढाऱ्यांनी पंचायत समितीच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत न पोहोचवता त्या मोजक्याच लोकांपुरत्या,अगदी स्वतःच्या घरापुरत्याच मर्यादित ठेवल्याचा गंभीर आरोप मतदार बांधवांकडून केला जात आहे.रस्ते,पाणी,वीज, घरकुल,स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर अपेक्षित कामे न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे."योजना घरात ठेवायच्या आणि मत मात्र जनतेकडून मागायची" अशी उपरोधिक टीका करत मतदार बांधव "दोन हाणा पण पुढारी म्हणा" अशा शब्दांत जुन्या राजकारणावर प्रहार करत आहेत.यामुळे निंबायती गणात यावेळी बदलाची स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.गावोगावी होणाऱ्या चर्चा,गाठीभेटी आणि प्रचारादरम्यान "आता बदल हवा आहे" आणि "एकच वादा – सोपानदादा" या घोषणा नागरिकांकडून मोठ्या आवाजात दिल्या जात असून, पारदर्शक,लोकाभिमुख आणि सर्वसामान्यांसाठी काम करणाऱ्या नेतृत्वाची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षाच्या (धनुष्यबाण) चिन्हावरील अधिकृत उमेदवार सौ. सविताताई सोपानदादा गव्हांडे यांना मत देऊन विकासाला साथ द्यावी,असे आवाहन शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. विकास कामांमध्ये कोणताही भेदभाव न करता योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार उमेदवारांकडून व्यक्त केला जात आहे.निंबायती गणात सध्या प्रचाराचा जोर वाढला असून,शिवसेनेच्या उमेदवाराला सर्वसामान्य नागरिक,शेतकरी,महिला व तरुण वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.यावेळी जुनी समीकरणे बदलून निंबायती गणात परिवर्तन घडणारच,असा ठाम विश्वास मतदार बांधव व्यक्त करत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# धानोरा येथील ग्रामस्थांचे तहसीलदार यांना निवेदन

## घरकुलासाठी स्वस्तदरात रेती व मुरूम उपलब्ध करून द्या

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : राळेगाव -तालुक्यातील धानोरा गावात जवळपास १०० नवीन घरकुल लाभार्थी असून घर बांधकामासाठी लागणारी रेती आमच्या गावालगत वर्धा नदी असूनसुद्धा ६००० ते ७०००रुपये प्रति ब्रास या किमतीने रेती घ्यावी लागत आहे या भावात जर रेती टाकावी लागली तर घरकुलाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. जर आम्हाला आपण आम्हाला स्वस्त दरात रेती उपलब्ध करून दिली तर आम्हाला खर्चात बचत करता येईल व घर बांधकाम लवकर करता येईल अगोदरच अनुदान प्रलंबित आणि त्यातच मोफत रेतीही नाही,यामुळे घरकुल लाभार्थी अडचणीत सापडले आहेत.दारिद्र्यरेषेखालील तसेच पक्के घर नसणारे,आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थींना विविध योजनेंतर्गतच्या घरकुलाचा लाभ दिला जातो. लाभार्थींना दिलासा महसूल मंत्री यांनी घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास मोफत रेती देण्याची घोषणा केली होती.तसे




शासन आदेशही निघाले.अद्यापही याचा लाभ लाभार्थींना मिळाला नाही.दुसरीकडे घरकुल योजनेंतर्गतचे अनुदान अनियमित असून,मोफत रेतीही मिळत नसल्याने घरकुलांचे बांधकाम पूर्ण कसे करावे?असा प्रश्न लाभार्थींमधून उपस्थित होत आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन घरकुलासाठी मोफत रेती उपलब्ध करून द्यावी,अशी मागणी लाभार्थींनी केली आहे,ग्रामस्थांचे घरकुलसाठी स्वस्त दरात रेती व मुरूम उपलब्ध करून देण्यात यावी यासाठी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले यावेळी उपसरपंच विशाल येणोरकर,स्वप्नील गलाट,प्रीतम घिनमीने,विजय मेश्राम,भोजराज जुनघरे,सुनील गेडाम,तुळशीराम गेडाम,आकाश सलाम,विजय चकोले,अविनाश घोडे, मनोहर देवतले,हर्षल घोडे,राजु गुजरकर,जीवन जुमनाके,निलेश वरघणे हजर होते.

# हणेगाव येथील सोना चांदीच्या दुकानातील चोरी चोरट्यांना पडली महागात

## सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास पवार यांच्या सतर्कतेमुळे चोराला पकडण्यात यश

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे** : देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथे मागील अनेक वर्षापासून चोरीचे प्रमाण वाढले असून बाजारपेठेतील व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. मागील काही वर्षात काडगे ॲन्ड सन्स,नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक,जय मल्हार ज्वेलर्स,इनामदार यांचे बेकरी व कोल्ड्रीक्सचे दुकान,वझर येथील भवानी मंदीरातील चोरी अशा अनेक घटना घडल्या असून यामध्ये मरखेल पोलीसांना यश मिळाले नसल्याची खंत सतावत होती.

अशातच परत एकदा हणेगाव येथील अच्यारे ज्वेलर्स यांचे दुकान फोडून सोने चांदीचे दागिणे,रोख रक्कम व इतर मुद्देमालासह सात लाख पंच्चेचाळीस हजार सातशे नव्वद रुपयाची चोरी करून पळ काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरांचा प्रयत्न फोल ठरला आहे.यावेळी मरखेल पोलिस




स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पवार,पोलिस कॉन्स्टेबल सय्यद व चालक पोलिस कॉन्स्टेबल सोनकांबळे यांनी दि.३० जानेवारी २०२६ च्या मध्यरात्री गस्तीच्या वेळेस हणेगाव बसस्थानक परिसरात नेहमीप्रमाणे रात्रगस्त घालत होते परंतू त्याचवेळेस अच्यारे ज्वेलर्स दुकानाचे शटर उघडे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले त्यामुळे त्यांचे संशय बळावल्याने तात्काळ पाहणी केली असता दुकानात चोरी होत असल्याचे दिसून आले.

पोलिसांची चाहूल लागताच चोरट्यांनी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी वेळीच दबंग स्टाईलने पाठलाग करून सेवकसिंग रघूविरसिंग तिलपल्ले वय वर्षे २२ रा. हनूमान गल्ली ता.उमरी जि. नांदेड या चोरास ताब्यात घेतले असून सद्दाम वय वर्ष २७ व सोहेल वय वर्ष २५ हे दोन चोर अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले आहेत.यावेळी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीकडून सोने चांदी रोख रक्कम असा एकूण सात लाख पंच्चेचाळीस हजार सातशे नव्वद रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी दुकान मालक अमित राजकुमार अच्यारे यांना संपर्क करून बोलावून घेतले असून अमीत अच्यारे यांनी फिर्याद दिली आहे.त्यानंतर मरखेल पोलिस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आले असून पुढील तपास मरखेल पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पवार हे करीत आहेत.

यावेळी या घटनेची माहिती नांदेड जिल्हयाचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांना मिळताच प्रत्येकी दहा हजार रुपयांची बक्षीस जाहीर केली आहे तर या घटनेतील चोरट्यांना दबंग स्टाईलने पकडल्याने हणेगाव येथील व्यापारी वर्गाकडून मरखेल पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पवार व त्यांच्या सहकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. यावेळी दुकान मालक अमित अच्यारे यांचे वडील राजकुमार अच्यारे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की,मागील काही वर्षांपासून अशा चोरीच्या घटना वाढल्या असून व्यापारी वर्गात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.दिवसेंदिवस व्यापाऱ्यांना व्यापार करणे अवघड झाले असून त्यामध्ये असे काही प्रकार घडल्यास व्यापारी खचून जात आहे तरी माझी प्रशासनाला एकच विनंती आहे की,अशा चोरांना कडक शिक्षा झाली पाहिजे जेनेकरून पुन्हा अशा घटना घडता कामा नये.

# आजी–माजी सहकारी मित्र गृप, ठाणे आगार यांच्या वतीने 'कोकण स्नेह मेळावा २०२६' उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नेरळ प्रतिनिधी/संदिपान कांबळे** : आजी–माजी सहकारी मित्र गृप, ठाणे आगार यांच्या वतीने आयोजित 'कोकण स्नेह मेळावा २०२६' मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. ठाणे आगारातील आजी व माजी सहकाऱ्यांनी एकत्र येत सुमारे २५ वर्षांच्या मैत्रीचा, सहकार्याचा आणि एकत्रित कष्टांचा स्नेहबंध या मेळाव्यात पुन्हा एकदा दृढ केला.या स्नेहमेळाव्याचे आयोजन दिनांक ०1फेब्रुवारी २०२६ (रविवार) रोजी दुपारी ३.०० वाजता करण्यात आले होते.न कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल चैतन्य, गुहागार गुढे फाटा,




मार्गावर करण्यात आले होते. कोकणातील निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्याने उपस्थितांच्या आठवणींना उजाळा दिला.

या मेळाव्यात ठाणे आगारात अनेक वर्षे सेवा बजावलेले चालक, वाहक, तांत्रिक कर्मचारी तसेच इतर आजी–माजी सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवाकाळातील अनुभव, आठवणी, संघर्ष, यशस्वी प्रवास आणि मैत्रीचे किस्से यांची मनमोकळी देवाणघेवाण यावेळी करण्यात आली. अनेक वर्षांनंतर पुन्हा भेटलेल्या सहकाऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तर चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसून आले.कार्यक्रमात एकत्र काम केलेल्या मित्रांची एकजूट, परस्पर सहकार्य आणि निष्ठा यांचे विशेष कौतुक करण्यात आले. "एकत्र काम केल्यानेच मैत्री टिकून राहते" हा संदेश या स्नेहमेळाव्यातून अधोरेखित झाला. कार्यक्रमादरम्यान सामूहिक छायाचित्रण, सन्मान सोहळा तसेच अनौपचारिक संवाद यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी आजी–माजी सहकारी मित्र गृपच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. भविष्यातही असेच स्नेहमेळावे सातत्याने आयोजित करून आपले नाते अधिक घट्ट करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

'कोकण स्नेह मेळावा २०२६' हा केवळ एक कार्यक्रम न राहता, तो ठाणे आगारातील सहकाऱ्यांच्या मैत्रीचा, विश्वासाचा आणि एकोप्याचा जिवंत दस्तऐवज ठरला, असे उपस्थितांनी भावना व्यक्त केल्या.

# सुदर्शन विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्र** : आष्टी तालुक्यातील शेतकरी शिक्षण संस्थेच्या सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवार, दिनांक २७ जानेवारी रोजी संध्याकाळी सात वाजता उत्साहात पार पडले.

या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन ह.भ.प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री व महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र धोंडे यांच्या शुभहस्ते झाले. आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ बोडके यांनी केले.

या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, नाट्य, गीत-संगीत सादरीकरण तसेच शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी नृत्य-नाट्याद्वारे प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्र



धोंडे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, इंजि. पांडुरंग बोडखे, सरपंच दत्तात्रय खोटे, सभापती शत्रुघ्न मरकड, उपसरपंच राहुल खिलारे, माऊली भोसले, रामदास खिलारे, ह.भ. बाबासाहेब झिंजुर्के, शेषराव भोसले, महादेव गवारे, भागवत बोराडे, दादासाहेब खिलारे, बाबासाहेब भोसले, अशोक गवारे, शिवाजी गवारे, नारायण गवारे, सद्दाम शेख, पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार दादा पवळ, पत्रकार सुरेश कांबळे, जगताप सर, चौरे सर, बांगर सर, पोटे सर, साखरे सर, देशमुख सर, समाजसेवक तथा शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख, पालक, आजी-माजी विद्यार्थी, माता-भगिनी तथा सांगवी, पाटण, लमाण तांडा, कारखेल, बु. डोईठाण, खिळद, धामणगाव येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हजारे सर यांनी केले तर आभार मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, धोंडे सर, ढोले सर,नालकोल सर,हाके सर, मरकड सर, बाबुराव खिलारे, ससाणे मॅडम यांनी मेहनत घेतली.

# वंचित बहुजन आघाडीची तालुकास्तरीय कार्यशाळा पिंपळगाव निपाणी येथे मोठ्या उत्साहात पार पडली

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक** : आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार असल्याचा कार्यकर्त्यांच्या वतीने निर्धार करण्यात आला.

तसेच निवडणुकीमध्ये येणाऱ्या बारीक बारीक अडचणी ची कार्यकर्त्यांच्या वतीने कशाप्रकारे सोडवणूक करण्यात येणार असल्याचे मार्गदर्शन पक्षनेत्यांच्या वतीने करण्यात आले. त्यासोबतच याठिकाणी मोठ्या प्रमाणात इच्छुक उमेदवारांनी आपली उमेदवारी निश्चित करण्याकरिता पक्षाच्या वतीने देण्यात आलेल्या इच्छुक उमेदवारी



अर्ज मोठ्याप्रमात भरण्यात आली.

त्यासोबतच याठिकाणी तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार देखील करण्यात आला. या कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून आलेले वंचित बहुजन आघाडीचे पूर्व चे जिल्हा अध्यक्ष राहुलभाऊ मेश्राम, महासचिव सिद्धार्थजी भोजने सर, माथाडी कामगार चे जिल्हा अध्यक्ष विनयभाऊ बांबोळे, ॲड. सुनीलभाऊ गजभिये, प्रा. रविंद्र चवरे, इंजि. सुरेश दांडगे साहेब यांनी कार्यशाळेला मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष चंदूभाऊ गणवीर , युवक आघाडी तालुका अध्यक्ष रोशनभाऊ गाडेकर, माथाडी कामगार तालुका अध्यक्ष प्रणव मेश्राम, कपिलभाऊ नाईक, विशाल राऊत, जयकिरण इंगोले, कुंदन मेश्राम, सतिश शेंडे, विजय डोंगरे, आर्थिक मेश्राम, अभय गणवीर यांच्यासह मोठ्याप्रमाणात कार्यकर्त्यांनी आपली उपस्थिती दाखवत नवीन उत्साह निर्माण केला

# मलंगगडावरील बांधकामाबाबत न्यायालयाकडून आपल्याला अपेक्षित निर्णय लागणार; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री मच्छिंद्रनाथांचे दर्शन

## माघी पौर्णिमेच्या उत्सवानिमित्त शिवसेनेकडून मलंगगडावर फडकले भगवे निशाण

**दैनिक युवक आधार**

**ठाणे/ प्रतिनिधी** : श्री मलंगगडावरील काही बांधकामाबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणात लवकरच अपेक्षित असलेला निर्णय येईल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. माघी पौर्णिमेच्या दिवशी श्री मलंगनाथ गडावर पुन्हा एकदा भक्ती, आस्था आणि उत्सवाच्या संगमाने उजळून निघाला आहे. या भव्य उत्सव यात्रेबाबत माहिती देताना, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघेसाहेबांच्या संकल्पनेतून सुरू झालेली ही मंगल यात्रा गेल्या अनेक वर्षांपासून



अखंडपणे सुरू असून यापुढेही याच उत्साहात सुरू राहील असे सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मलंगगडावर श्री मच्छिंद्रनाथ बाबांच्या समाधी स्थळाचे दर्शन आणि पूजा केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्याप्रसंगी ते बोलत होते.

राज्यभरातून तसेच परराज्यातूनही हजारो-लाखो भाविक मलंगनाथाच्या दर्शनासाठी मलंगगडावर दाखल होत आहेत. नाथांच्या समाधीचे दर्शन घेत भक्त भावविवश होत असून, परिसरात दिवसभर "नाथांचा जयघोष" घुमत आहे. यात्रेनिमित्त संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला आहे.यावर्षी यात्रेला विशेष स्वरूप प्राप्त झाले असून भाविकांसाठी फ्युनिक्युलर (रोपवे) सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे वयोवृद्ध, महिला आणि चालण्यास अडचण असलेल्या भाविकांनाही सहजपणे मलंगनाथांचे दर्शन घेता येत आहे. पूर्वी दर्शनापासून वंचित राहणाऱ्या अनेक भक्तांसाठी ही सेवा मोठा दिलासा ठरत असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले.

धर्मवीर आनंद दिघेसाहेबांनी सुरू केलेली ही सेवा अखंडपणे सुरू ठेवण्याचे काम आजही भक्त आणि सेवाभावी संस्था करत असून, यात्रेचा अनुभव अधिक सुखकर आणि सुरक्षित बनवण्यावर भर दिला जात आहे, असे ही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मलंगगड परिसरातील मालमत्तांबाबत न्यायालयात प्रकरण सुरू असून, लवकरच यावर न्यायालयाचा निर्णय येण्याची शक्यता असल्याचे सांगितले. यावेळी आमदार राजेश मोरे, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, ठाणे विधानसभा प्रमुख हेमंत पवार, शिवसेना उत्तर महाराष्ट्र सचिव भाऊसाहेब चौधरी, कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख महेश गायकवाड आणि नगरसेविका नम्रता भोसले जाधव आणि शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी आवर्जून उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सौ माधुरी सागर भिसे शेतकऱ्यांच्या बांधावर

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गट व सणसर पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार जिल्हा परिषद उमेदवार सौ माधुरी सागर भिसे व पंचायत समिती उमेदवार कु ज्योस्त्ना मोहन सुरडकर आणि लासुर्णे पंचायत समिती उमेदवार हर्षवर्धन लोंढे यांच्या प्रचारासाठी प्रत्येक गावातील स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते डोअर टू डोअर



प्रचारात सहभागी झाले आहेत.

थेट मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी सौ.माधुरी सागर भिसे कु ज्योस्त्ना सुरडकर श्री हर्षवर्धन लोंढे यांनी आघाडी घेतली असून जिल्हा परिषद गटातील गावागावात वाडी वस्तीवर जाऊन ते नागरिकांशी संपर्क करत आहेत. पाणीपुरवठा,रस्ते,शिक्षण आरोग्य,महिला सक्षमीकरण तसेच युवकांच्या रोजगाराच्या संधी हे मुद्दे गावभेटीदरम्यान प्राधान्याने मांडण्यात येत आहेत या भेटीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिन्हीही उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन ते करत आहेत.

# पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी–१, मुदखेड येथे गंभीर अनागोंदी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी प्रकाश गवारे मुदखेड** : पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी–१, मुदखेड येथे अधिकारी व कर्मचारी असतानाही दवाखान्यात वेळेवर कर्मचारी व अधिकारी उपस्थिती नसल्याने नागरिक व पशुपालकांची मोठी गैरसोय होत आहे. कार्यालयीन वेळेत दवाखाना बंद असल्याचे चित्र असून जनावरांच्या उपचारांसाठी आलेल्या शेतकऱ्यांना वाट पाहत बसावे लागत आहे.

दवाखान्यात डॉक्टर जगताप (मायादम सहायक आयुक्त), डॉक्टर प्राजक्ता पेंडकर (विस्तार अधिकारी), डॉक्टर खान (विस्तार



अधिकारी)नरवाडे (मायादम पशुधन प्रवेशक) व पिराजी हाटकर (परिचर) असे कर्मचारी कार्यरत असतानाही स्वच्छतेचा अभाव आहे.नेहमी गैरहजर मनमाणी ड्युटी करत आहेत. परिसरात अस्वच्छता असून जनावरांना पिण्यासाठी पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही.

गंभीर बाब म्हणजे जनावरांच्या गर्भधारणेसाठी आवश्यक सेवा दवाखान्यात उपलब्ध नसून बीए–३ कंठर बाहेर खासगी डॉक्टरांकडे ठेवले जाते. त्यामुळे पशुपालकांना आधी त्या डॉक्टरांच्या घरी जाऊन त्यांना बोलावून दवाखान्यात आणावे लागते, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

या सर्व प्रकाराकडे संबंधित D.D. साहेबांचे त्या अधिकाऱ्याकडे आणि दवाखान्याकडे दुर्लक्ष करीत आहेत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत असून तातडीने दखल घेऊन दवाखान्यात नियमित सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पशुपालकांनी केली आहे.

# रिसोड येथे संत रविदास महाराज जयंती साजरी

## मुंबईतील सार्वजनिक खोल्या वाचविण्यासाठी एकजुटीचा निर्धार; सामाजिक ऐक्याचे प्रभावी दर्शन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर :** साहित्य संघ, गिरगांव मुंबई येथे पोमेंडी पश्चिम रांगळेवाडी यांच्या वतीने स्व. गणपत मानक रांगळे यांच्या स्मरणार्थ आयोजित कौटुंबिक स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि दिमाखात पार पडला. सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जतन आणि *मुंबईतील सार्वजनिक खोल्या वाचविण्याच्या संघर्षाला बळ देणारा हा स्नेहमेळावा ठरला*. वाडीतील बांधव-भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे व अध्यक्ष पंढरीनाथ रांगळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम हाऊसफुल्ल झाला आणि एकजुटीचे प्रभावी दर्शन घडले.

यावेळी कुणबी समाजोन्नती संघ, मुंबईचे सरचिटणीस कृष्णाजी वने गुहागर विधानसभेचे माजी आमदार विनयजी नातू भाजपा उत्तर रत्नागिरी ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष तथा पोमेंडी गावचे सुपुत्र मंगेश रांगळे भाजपा उत्तर रत्नागिरीचे सरचिटणीस निलेशजी सुर्वे माजी रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष प्रशांतजी शिरगावकर कुणबी समाजोन्नती संघ तालुका गुहागर शाखेचे अध्यक्ष अनंत मालप मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. सुभाषजी बाणे तसेच भाजपाचे तालुकास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोमेंडी पश्चिम रांगळेवाडीने हा स्नेहमेळावा केवळ स्नेहबंध दृढ करण्यापुरता मर्यादित नसून, वाडीच्या विविध सामाजिक उपक्रमांना चालना देणे तसेच सार्वजनिक खोलीच्या लढ्यासाठी एक




महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

कार्यक्रमादरम्यान कानसे ग्रुप चिखली यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या कोंकणातील प्रसिद्ध नमन कलेने उपस्थितांची मने जिंकली. त्याचप्रमाणे "दक्खनचा वाघ" या ऐतिहासिक वगनाट्याने कार्यक्रमात रंगत भरली आणि उपस्थितांची मने जिंकली. यावेळी वाडी मंडळाने तयार केलेली चित्रफीत सादर करण्यात आली. या चित्रफितीतून गावच्या विकासकामांचा आढावा प्रभावीपणे मांडण्यात आला या सादरीकरणामुळे उपस्थितांना गावच्या लाल मातीची जिव्हाळ्याची आठवण झाली.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून पूर्वीच्या काळी गावखोलीचे सामाजिक महत्त्व, तसेच आज अनेक ठिकाणी त्या खोलींवर होणाऱ्या अन्यायकारक अतिक्रमणांवर तीव्र चिंता व्यक्त करत, पोमेंडी पश्चिम रांगळेवाडीचा सुरू असलेला लढा निश्चितच यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला आणि शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाने वाडीच्या एकजुटीने सर्व काही साध्य होऊ शकते, हा प्रेरणादायी संदेश सर्वांपर्यंत पोहोचवत सामाजिक बांधिलकी अधिक दृढ केली.

---

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी /रणजितसिंह ठाकुर :** दिनांक एक फेब्रुवारी 2026 रोजी चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती रिसोड शहरात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. रिसोडच्या चर्मकार विकास प्रबोधिनीने पुढाकार घेत संत रविदास महाराज जयंती समारंभाचे आयोजन, संत सातारकर महाराज संस्थान रिसोड येथे केले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री अर्जुन खिराडे सर

तर प्रमुख पाहुणे म्हणून रिसोड शहराचे नगराध्यक्ष श्री भगवान दादा क्षीरसागर, पीएसआय श्री गोखले साहेब, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष श्री गजानन खंदारे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कव्हर तसेच श्री व शांतता कमिटीचे अध्यक्ष समाजसेवक श्री मंचकराव जाधव, संत सातारकर महाराज संस्थानचे अध्यक्ष दत्तराव देशमुख, रिसोड नगर परिषद उपाध्यक्ष




श्री विष्णू भाऊ कदम, नगरसेवक श्री संतोषराव च-हाटे, श्री संजय बगडिया उपस्थित होते. विचार मंचावर चर्मकार समाजातील काही ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. प्रास्ताविका मधून श्री दिनकर कानडे यांनी, चर्मकार समाजाने सांप्रत काळानुसार अपडेट होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. नंतर समाजातील बालवक्त्यांनी संत रविदास महाराज यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. मुख्याध्यापक श्री राधाकिसन झुंजारे सर यांनी, मान्यवरांना रिसोडचे चर्मकार बांधव गेल्या आठ वर्षापासून समाज मंदिरासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

संभाजी ब्रिगेडचे श्री गजानन खंदारे यांनी आपल्या मनोगतात, महाराष्ट्राच्या महान संत परंपरेची माहिती सर्वांना दिली. तालुकाध्यक्ष श्री शिवाजी कव्हर सर यांनी, आपण थोर महान संतांना, नेत्यांना जातीच्या चौकटीत बंद केले, याबद्दल विचार होऊन परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. असे महत्त्वाचे आवाहन केले. रिसोड शहराचे नगराध्यक्ष श्री भगवानदादा क्षीरसागर यांनी आपल्या भाषणात, संत रविदास महाराजांची जयंती अतिशय शांतपणे व नियोजनबद्ध व वैचारिक पद्धतीने साजरी केल्याबद्दल चर्मकार समाजाचे कौतुक केले तसेच चर्मकार समाजाच्या रिसोड येथे रविदास भवनाच्या मागणीचा विषय मार्गी लावू, असे आश्वासन दिले. पीएसआय श्री गोखले साहेब यांनी, समाजातील बाल वक्त्यांना व्यासपीठावर बोलण्याची संधी देऊन त्यांच्यात सभाधिटपणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि सेवानिवृत्त समाज बांधवांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमस्थळी समाजातील महिलांनी सुंदर रांगोळीची आरास केली.कार्यक्रमाचे बहारदार संचलन सचिव श्री शंकर गायकवाड सर यांनी केले. तर आभार प्रा. पानझाडे सर यांनी मानले.कार्यक्रमासाठी रिसोड मधील सर्व चर्मकार समाज बांधव आणि भगिनी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चर्मकार विकास प्रबोधिनीचे अध्यक्ष श्री पांडुरंग घायाळ,

एकनाथ खिराडे, रमेश खिराडे, विजय झुंजारे,गणेश घायाळ,आत्माराम निळे, प्रदीप खिराडे सर,पंढरी राजगुरू, संतोष वानरे सर, प्रमोद कानडे विजय राजगुरू आणि रिसोड मधील सर्व समाज बांधवाचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## सामान्य कुटुंबातील असामान्य मुलगी

घोट गावातील सर्वसामान्य कुटुंबातील *कु. प्रणाली दत्तात्रेय हजारे* हिने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर इयत्ता *१० वीच्या परीक्षेत ९३.२०% गुण मिळवत प्रसिद्ध अशा दुर्गे क्लासेस – पाले खुर्द येथे प्रथम क्रमांक पटकावून संपूर्ण *घोट गावाचा* व परिसराचा नावलौकिक वाढवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरणारे आहे.

कठोर परिश्रम, सातत्य, जिद्द आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर *कु. प्रणाली* हिने हे घवघवीत यश संपादन केले असून, तिच्या या यशामागे तिच्या कुटुंबाचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि दुर्गे क्लासेसचे शैक्षणिक वातावरण कारणीभूत आहे, हे आवर्जून नमूद करावे लागेल.

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा विश्वासार्ह आधारस्तंभ म्हणजेच आदरणीय *ॲड. राकेश दुर्गे दादा यांचे दुर्गे क्लासेस* – पाले खुर्द. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणासाठी शहराकडे धाव घ्यावी लागू नये, त्यांना आपल्या गावातच दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, या उदात्त हेतूने दुर्गे दादांनी सुमारे २४ वर्षांपूर्वी आपल्या गावात एका छोट्याशा खोलीतून शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला.

त्या वेळी अनेक अडचणी, मर्यादा व आव्हाने होती. मात्र दृढ निश्चय, प्रामाणिक मेहनत आणि शिक्षणावरील निस्सीम श्रद्धा यांच्या जोरावर त्यांनी लावलेले हे रोपटे आज एका भक्कम वटवृक्षात परिवर्तित झाले आहे. आज या क्लासेसमधून घडलेले असंख्य विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, वकील, अधिकारी, उद्योजक अशा विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत, ही बाब संपूर्ण ग्रामीण भागासाठी गौरवास्पद आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पनवेल, कळंबोली, कामोठे यांसारख्या दूरच्या ठिकाणी जावे लागत होते, ती उणीव *दुर्गे क्लासेस* ने भरून काढली असून, आज या परिसरातील पालकांचा *दुर्गे क्लासेसवर* प्रचंड विश्वास आहे.

*कु. प्रणाली* हिच्या या उज्ज्वल यशाबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन

तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तसेच उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही मनापासून शुभेच्छा देतो.तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भविष्यास आकार देणाऱ्या आदरणीय दुर्गे दादा यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रेरणादायी कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा आज दुर्गे क्लासेसच्या २४* वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा साक्षीदार होताना आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

अशाच प्रकारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात अग्रस्थानी नेण्याचे कार्य भविष्यातही अखंड सुरू राहो, हीच सदिच्छा

**आपला नम्र,**
**श्री. दत्तात्रेय गणपत हजारे**
**(घोट)**

---

## जालना जिल्ह्यात जाफराबाद तालुक्यात मौजे शिंदी जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दीन मोठ्या उत्सवात साजरा

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद प्रतिनिधि दिनकर जंजाळ :** दिनांक २६जानेवारी २०२६रोजी ७७व्यां प्रजासत्ताक दिवस जिल्हापरिषद प्राथमिक शाळा शिंदी येथे मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला यावेळी सन्माननीय मुख्याध्यापक गोळाईत सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गीताबाई बळीराम जंजाळ उपाध्यक्ष शे.गुलाब शे.मुनाब .दिनकर रामराव जंजाळ.विषाणू फुकिरबा जंजाळ.अरुण पुंजाराम जंजाळ शपिक सय्यद रफीक

गणेश नारायण जंजाळ संतोष पांडुरंग जंजाळ रमजान तडवी तसेच शिक्षक वर्ग मुख्याध्यापक गोलाई सर सह शिक्षक लोखंडे



सर मारमट सरमिर्गे सर शेक सर खंदाडे सर धनावत सर गावचे सरपंच केसरबाई गणेश जंजाळ उपसरपंच अनुसायाबई संतोष जंजाळ सदस्य संदीप बाबुराव हिवाळे संजय पटीलबा जंजाळ सुरेश धनाजी जंजाळ अधी मान्यवर तसेच सर्वच गावचे नागरिक उपस्तीत होते विद्यारथानी मोठ्याप्रमाणात कार्यक्रमात भाग घेऊन लेझिम संगीत पर्भोधन नाट्य व कला सादर केली.

---

## पोलीस स्टेशन बेलतरोडी येथे 1)घरफोडी, 2)जबरी चोरी व 3) वाहन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस – आरोपी अटक केले आहे

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** पोलीस स्टेशन बेलतरोडी हद्दीत आज दिनांक 31/01/2026 रोजी घरफोडी, जबरी चोरी व मोटारसायकल चोरी या प्रकारातील गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या 3 आरोपींना अटक करून एकूण तीन गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

सदर आरोपींकडून

घरफोडीच्या गुन्ह्यात सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

जबरी चोरीच्या गुन्ह्यात मोटारसायकल व मोबाईल जबरीने हिसकावण्यात आले होते, यावेळी पीडितास दुखापतही करण्यात आली होती.

मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात चोरीची दुचाकी गैरवापरासाठी वापरण्यात आली होती.

या तिन्ही गुन्ह्यांतील आरोपींना अटक करण्यात आलेली असून खुनाचा गुन्हा घर फोडीचा गुन्हा/ जबरी चोरीची गुन्हे /व इतर गंभीर गुन्हे असलेले आरोपी गुन्हे अभिलेखावरील (History-sheeter) असल्याचे निष्पन्न झाले आहे. गोपनीय माहितीच्या आधारे तपास पथक, पोलीस स्टेशन बेलतरोडी यांनी सदर आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेला चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे —

1.तुषार राजेश राऊत, रा. हुडकेश्वर
2.पवन इंद्रजीत ब्रह्मे, रा. हुडकेश्वर
3. शेखर हरी हातागळे, रा. अजनी

ही उत्कृष्ट कारवाई मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. 4, नागपूर, श्रीमती रश्मिता राव मॅडम व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, अजनी विभाग, श्री. नरेंद्र हिवरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मुकुंद कवाडे व त्यांच्या तपास पथकाने DB पथक यांना केली आहे.

---

## टिटवाळा येथील हरी ओम व्हॅली सोसायटीस "इमेज सोसियल आयकॉन अवॉर्ड २०२६"ने सन्मानीत

**दैनिक युवक आधार**

**टिटवाळा (दत्ता खंदारे /प्रतिनिधी ) :** टिटवाळा पूर्व भागात असलेली हरी ओम व्हॅली सोसायटी (बिल्डिंग क्रमांक १ आणि २) ला दि.१फेब्रुवारी २०२६रोजी "इमेज सोसियल आयकॉन अवॉर्ड २०२६"ने ठाणे येथील रेगे सभागृह,मुंबई मराठी संग्रहालय बिल्डिंग मध्ये दिग्विज मान्यवरांच्या शुभहस्ते प्रधान करण्यात आला.प्रथमच टिटवाळा शहरात ह्या सोसायटीस असा सन्मान प्राप्त होणे ही खूपच मोठी गोष्ट आहे. विशेष ह्या सोसायटीत नव्याने आरूढ झालेली कमिटी नेहमी नवनवीन संकल्पना राबवत असते. पाचच महिण्यात कमिटीने पदभार हाती घेऊन महाराष्ट्र राज्याच्या ठाणे जिल्ह्यात आपल्या निस्वार्थ सामाजिक कार्याचा ठसा उमटवला.




टिटवाळा शहरात कित्येक सोसायटीला ही सोसायटी आदर्श झाली आहे.नवीन कमिटीचे अध्यक्षा सौ प्राची बनसोडे,सचिव.श्री भाऊ अडसूळ,खजिनदार.श्री संतोष डहाळे आणि प्रभारी अध्यक्ष राजेंद्र सावंत(सामाजिक सेवक) तसेच सल्लागार बोडके साहेब अशा स्तंभावर उभी असलेली ही सोसायटी अखेर कार्यात यशस्वी ठरली.झाडे लावा झाडे जगवा संकल्पना राबविली,सोसायटी परिसरात स्वच्छता अभियान,महिला वर्गाना प्रोत्साहन,जल पूजन, सुरक्षेतेसाठी सी.सी.टीव्ही.बसविणे वेळोवेळी सोसायटीत कार्याची जनजागृती इत्यादी सामाजिक कामे नवीन कमिटीने संगमातानी करून इतर सोसायटीना उत्तेजीत केले आणि उत्साह वाढविला.आज पर्यंत सोसायटीने १००च्या वर फुलझाडे, वृक्ष लावून परिसरात पर्यावरण समतोल ठेवला आहे.ह्या उल्लेखनी कार्याची दखल इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड संस्थेने घेऊन ठाणे जिल्हा मानाचा तुरा रोवला.ह्या पूर्ण कार्यासाठी सोसायटी सभासदांनी आणि भाडे तत्त्वावर राहत असलेल्या कुटुंबीयांचा ही खारीचा वाटा आहे. आज टिटवाळा शहरात कौतुकाचा वर्षाव होतांना पहावयास मिळते.

---

## घरामधे आजी-आजोबांच्या औषधाचे डबे वेगवेगळे ठेवावे - प्रा.डॉ.जयपाल पाटील

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी. भोईर :** आपल्या घरामधील जेष्ठ नागरिकांच्या औषधांच्या गोळ्या साठी वेगवेगळे डबे तयार करून त्यावर आई-बाबां असे लिहून ठेवावे म्हणजे नातवंडाकडुन चुक होऊन गोळ्याचा बदल झाला तर मोठी आपत्ती येऊ शकेल त्या मुळे मनस्ताप, रुग्णालय खर्च येतो यासाठीही काळजी घेणे महत्वाचे आहे असे आपत्तीव्यवस्थापन तज्ञ प्रा.डॉ.जयपाल पाटील यांनी ममता नगर सोसायटी अलिबाग च्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सत्यनारायण पुजे प्रसंगी सांगितले.

या वर्षी पुजेचा मान अध्यक्ष श्री.व सौ.संदीप वारगे यांचा होता.यावेळी डॉ.जयपाल पाटील यांचा परिचय श्री.संदीप वारगे यांनी करुन दिला तर पुष्पगुच्छ, नारळ श्री.हेमंत भोपी यांनी देऊन सन्मान केला. महिला वर्गा साठी गॅस सिलेंडर,गॅसची नळी, फ्रीज, कुकर,यांचे होणारे अपघात, साप, विंचु दंश कशी काळजी घ्यावी.आकाशातील वीजेबाबत दामीनी अँप चा वापर, घरातील जेष्ठ नागरिकाची काळजी ,सीपीआर चे प्रात्यक्षिक व अडचणीतील बाळंतपणात व अपघात प्रसंगात १०८ चे जिल्हा प्रमुख श्री.अजय जगताप यांना



संपर्क साधतात डॉ.जयप्रकाश पांडे व पायलट श्री. सुशांत पाटील हे उपस्थित राहुन डॉ.पांडे यांनी मोफत १०८ चा वापर कसा करावा याची माहीती दिली. यावेळेस सोसायटीतील १०० सभासद उपस्थित होते. कार्यक्रमास चेंढरे ग्रामपंचायत माजी उपसरपंच प्रणिता पाटील, नायब तहसीलदार दत्तात्रय महाले,हेमंत भोपी,महेश गुरव,संदिप जाधव, अनिल शिंदे,विशाल आढाव,देवेंद्र पाटील, प्रमोद पाटील, देवकाते,सांळुके सोसायटी सदस्य व महिला उपस्थित होत्या. शेवटी आभार सौ.वारगे यांनी मानले.

---

## कचारगडच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील – आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/जिल्हा प्रतिनिधी (गोंदिया) :** कचारगड लाखो आदिवासी भाविकांचे श्रध्दास्थान आहे. अनेक राज्यांमधून दरवर्षी भाविक येथे मोठ्या श्रद्धेने येत असतात. येथे येणाऱ्या भाविकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे कचारगडच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी केले.राष्ट्रीय स्तरावरचा गोंडी समाजाचा सांस्कृतिक उत्सव, महाअधिवेशन तथा कोया पुनेम महापुजा निमित्त सालेकसा तालुक्यातील धनेगाव येथे 30 जानेवारीपासून 'पारी कोपार लिंगो' माँ कली कंकाली पेनठाना देवस्थान कचारगड यात्रा सुरु झाली असून येथील सांस्कृतिक भवन येथे शनिवारी आयोजित कार्यक्रमात श्री. उईके बोलत होते.

राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, खासदार डॉ.प्रशांत पडोळे, सर्वश्री आमदार संजय पुराम, डॉ.परिणय फुके, माजी आमदार (गडचिरोली) देवराव होळी, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, धनेगाव ग्रामपंचायत सरपंच सिंधू घरत, जिल्हा परिषद सदस्य सविता पुराम, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यावेळी उपस्थित होते.

श्री. उईके म्हणाले, कचारगड ही आदिवासी समाजाची पवित्र भूमी आहे. या ठिकाणी आदिवासी बांधव मोठ्या भक्ती भावाने येतात. आदिवासी ही आपली गौरवशाली संस्कृती आहे. आपल्या संस्कृतीचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. या ठिकाणी मिळालेल्या आशिर्वादरुपी ऊर्जा, आदिवासी बांधवांच्या विकासासाठी प्रेरणा देणारी असते.जल, जमीन व जंगलाचे संवर्धन आदिवासी समाजाने केले आहे. या समाजाच्या प्राचीन अशा संस्कृतीचे जतन करण्याचा शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. शासकीय आश्रमशाळेत शिकत



असलेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात येत आहे. आदिवासी समाजातील सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरेचे संवर्धन करण्यावर भर देणार आहे. आदिवासींच्या समस्या सोडविण्यावर भर देणार असून कचारगडच्या विकासासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करेन असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

श्री. भोयर म्हणाले, कचारगड हे आदिवासी बांधवांचे पवित्र श्रध्दास्थान आहे. या भागातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन कचारगडच्या विकासासाठी ज्या असुविधा भासत आहेत, त्या सर्व सुविधा आपण शासन स्तरावर पुढाकार घेऊन सोडवू असे त्यांनी यावेळी सांगितले.कचारगड ही यात्रा आत्मिक शांतीकडे घेऊन जाते. आपण आपली संस्कृती विसरु नये. गोंडी भाषेला राष्ट्रीय भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र शासन स्तरावर आपण नक्कीच प्रयत्न करु असे खासदार डॉ.प्रशांत पडोळे म्हणाले.कचारगड हे आदिवासी समाजाचे श्रध्दास्थळ असून गोंडी समाजाचे केंद्रबिंदू आहे. कचारगडच्या विकासासाठी शंभर कोटींचा निधी मंजूर करण्यात यावा, गोंडी भाषेला राष्ट्रीय भाषेचा दर्जा मिळावा, या ठिकाणी भाविकांच्या सोईच्या दृष्टीने कायमस्वरुपी भव्य दिव्य असे व्यासपीठाचे निर्माण करण्यात यावे, अशा मागण्या आमदार संजय पुराम यांनी आपल्या भाषणात व्यक्त केल्या. प्रास्ताविक व सुत्रसंचालन भरत मडावी यांनी केले. कार्यक्रमास आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

# अवयवदान जनजागृतीसाठी पनवेलमध्ये वॉकेथॉन

## रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरचा सामाजिक उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (प्रतिनिधी) :** अवयवदानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, तसेच अवयवदानातून अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांच्या वतीने आज पनवेल येथे अवयवदान जनजागृती वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात पिल्लई कॉलेज, पनवेल येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.




"आपले किंवा आपल्या आप्तस्वकीयांचे अवयव दान करून कुणाचे तरी आयुष्य वाचवता येते. अवयवदान म्हणजे केवळ दान नसून, तो मानवतेचा सर्वोच्च आविष्कार आहे. अशा उपक्रमांतून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे," असे मत रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरच्या अध्यक्षा रोटेरियन सुनिता मुकुंद चौधरी यांनी यावेळी व्यक्त केले.

या जनजागृती वॉकेथॉनमध्ये रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोटेरियन सुनिता मुकुंद चौधरी, सचिव रोटेरियन श्वेता खेडवळ, उपाध्यक्ष रोटेरियन पुरनसिंग मेहरा यांच्यासह क्लबचे सदस्य सहभागी झाले होते. तसेच इंटरॅक्ट क्लबची मुले व त्यांचा सायकलिंग ग्रुप यांची उपस्थितीही लक्षवेधी ठरली.

दरम्यान, सामाजिक बांधिलकीचा आणखी एक आदर्श ठेवत, उपाध्यक्ष व युथ डायरेक्टर रोटेरियन पुरनसिंग मेहरा यांनी नेरे, महालक्ष्मी येथे नव्याने सुरू केलेल्या सायकलिंग क्लबच्या माध्यमातून पाच गरजू मुलांना पाच सायकली दान केल्या. या उपक्रमामुळे रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरच्या कार्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.वॉकेथॉनद्वारे अवयवदानाबाबत जनजागृती होण्यासोबतच समाजात मानवतावादी मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे उपस्थितांनी सांगितले.

# आयएचडी २०२६' मध्ये अपोलोची भविष्यातील रुग्णालय संकल्पनेची घोषणा

## 'हॉस्पिटल ऑफ द फ्युचर' लवकरच साकारणार - डॉ. संगीता रेड्डी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** अपोलो हॉस्पिटल्सने आयोजित केलेल्या 'इंटरनॅशनल हेल्थ डायलॉग (IHD) २०२६' या परिषदेचा हैदराबादमध्ये समारोप झाला. दोन दिवसांच्या परिषदेमध्ये प्रत्यक्ष आणि ऑनलाईन माध्यमातून २७,००० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते. 'ग्लोबल व्हॉइसेस, वन व्हिजन' या संकल्पनेवर आधारित या परिषदेत भारत आणि परदेशातील डॉक्टर, रुग्ण सुरक्षा तज्ञ, तंत्रज्ञ आणि धोरणकर्ते एका व्यासपीठावर आले होते. या जागतिक परिषदेत ७५ हून अधिक संस्थांकडून ३०० पेक्षा जास्त शोधनिबंध आणि १२० हून अधिक पुरस्कार प्रवेशिका सादर करण्यात आल्या. प्रामुख्याने नेतृत्वाच्या पुढाकारातून निर्माण झालेली सुरक्षा, समान आरोग्य रचना आणि जबाबदार डिजिटल परिवर्तन या विषयांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.



या परिषदेत वरिष्ठ भारतीय आणि आंतरराष्ट्रीय धोरणकर्ते आणि आरोग्य मंत्री, तसेच जागतिक दर्जाचे गुणवत्ता आणि रुग्ण सुरक्षा क्षेत्रातील नेते सहभागी झाले होते, ज्यात तेलंगणातील चेवेल्ला येथील खासदार कोंडा विश्वेश्वर रेड्डी; जॉइंट कमिशन इंटरनॅशनल (JCI) चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जोनाथन बी. पर्लिन; इंटरनॅशनल सोसायटी फॉर क्वालिटी इन हेल्थ केअर (ISQua) चे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्स्टन एंजेल; नॅशनल ॲक्रेडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (NABH) चे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल मोहन कोचर; काँगो प्रजासत्ताकचे आरोग्य आणि लोकसंख्या मंत्री जीन रोझेर इबारा; घानाच्या आरोग्य उपमंत्री ग्रेस आयेंसू-डांकवाह; दक्षिण सुदान प्रजासत्ताकच्या आरोग्य मंत्री सारा क्लेटो रियाल; आणि टोंगाचे आरोग्य मंत्री हुआकावामेलिकू सियाओसी सोवालेनी यांचा समावेश होता.

डॉ.संगीता रेड्डी, संयुक्त व्यवस्थापकीय संचालिका अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप म्हणाल्या," हैदराबादमध्ये लवकरच साकारणारे 'हॉस्पिटल ऑफ द फ्युचर' आणि रुग्णालयाच्या भिंतींपलीकडे विस्तारणारी 'भविष्यातील आरोग्य प्रणाली' (Health System of the Future) उभारण्याच्या ध्येयाचा त्यांनी समावेश केला. आरोग्य सेवा आता केवळ संस्थांपुरती मर्यादित न राहता ती एक व्यापक यंत्रणा बनत आहे; केवळ गरजेपुरते उपचार घेण्याऐवजी आता निरंतर आरोग्यावर भर दिला जात आहे. मानवी प्रक्रियांऐवजी आता 'एआय' आधारित कार्यपद्धती रूढ होत आहे. तंत्रज्ञान ही आता केवळ एक अतिरिक्त सोय राहिलेली नाही, तर तो आरोग्य सेवेचा कणा बनत आहे; परंतु हे तंत्रज्ञान मानवी नेतृत्वाखाली आणि सहानुभूतीवर आधारित असणे अनिवार्य आहे. आपली आव्हाने केवळ साध्या प्रगतीने सुटणारी नाहीत, तर आरोग्य क्षेत्राला आता क्रांतिकारी आणि वेगवान उपायांची गरज आहे."

डॉ.प्रताप सी.रेड्डी यांनी वर्च्युअल भाषणाद्वारे एक मोठी घोषणा केली की, अपोलो हॉस्पिटल्स आता शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांसह वर्षाचे ३६५ दिवस, २४ तास कार्यरत राहतील. रुग्णांसाठी आरोग्य सेवेची उपलब्धता कशी असावी, याची नवी व्याख्या त्यांनी या निमित्ताने मांडली. ते म्हणाले, "माणसं जेव्हा आजारी पडतात, तेव्हा आरोग्य सेवा विश्रांती घेऊ शकत नाही. उपचार हे केवळ कामाच्या दिवसांतच नव्हे, तर वर्षाचे ३६५ दिवस उपलब्ध असायला हवेत. तंत्रज्ञानाने नेहमीच माणुसकीला साथ दिली पाहिजे, तिची जागा घेता कामा नये. भविष्यातील आरोग्य सेवा केवळ रुग्णालयांपुरती मर्यादित नसेल, तर ती आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग असेल."

# प्रवीण बोपुलकर लिखित 'वाळन' कथासंग्रहाचे थाटात प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** येथील लेखक प्रवीण ज. बोपुलकर यांच्या 'वाळन' या कथासंग्रहाचे प्रकाशन दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी आंध्र कला समिती, पनवेल येथे साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. राजेंद्र माने यांनी भूषविले. कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा. प्रतिभा सराफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोहिदास पोटे (माजी शिक्षण सहसंचालक, महाराष्ट्र शासन) तसेच संदीप राक्षे (लेखक तथा सामाजिक कार्यकर्ते) यांची विशेष उपस्थिती लाभली.

'वाळन' या कथासंग्रहामध्ये ग्रामीण व शहरी जीवनातील वास्तव, माणसांच्या भावना, संघर्ष, नातेसंबंध आणि सामाजिक जाणिवांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. लेखकाची साधी, प्रांजळ भाषा आणि आशयघन कथनशैली वाचकांच्या मनाला स्पर्श करते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



**कथासंग्रह 'वाळन' चे प्रकाशन करताना लेखक प्रवीण ज. बोपुलकर, सौ.पायल बोपुलकर, प्रा. प्रतिभा सराफ, अध्यक्ष डॉ. राजेंद्र माने, विशेष उपस्थित रोहिदास पोटे व संदीप राक्षे, अश्विनी अतकरे तसेच प्रकाशक देवेंद्र इंगळकर, विलास पुंडले व इतर मान्यवर.**

कार्यक्रमात लेखक प्रवीण ज. बोपुलकर यांनी आपल्या लेखनप्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. या कथासंग्रहाचे प्रकाशन सर्जनशील पब्लिकेशन मार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी अतकरे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. याप्रसंगी निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे अध्यक्षपद ज्योत्स्ना राजपूत यांनी भूषवले. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून उपस्थित असलेल्या कवींनी कवी संमेलन अधिक उंचीवर नेले.सह सचिव रामदास गायधने, रायगड महिला संघटन प्रमुख माधवी मोतलिंग व केंद्रीय प्रसिद्धी प्रमुख विलास पुंडले यांच्या संयोजनातून प्रकाशन सोहळा उत्साही वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाने माणगाव, महाड आणि श्रीवर्धन मधील शिवसेनेच्या उमेदवारांना पाठिंबा केला जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्ष रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सुयोग लोखंडे, महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव, व माणगाव तालुका अध्यक्ष नितेश हाटे यांनी रायगड जिल्हा संघटक राजेश हाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिंदे गटाचे महाडचे आमदार व महाराष्ट्र राज्याचे मंत्री भरत शेठ गोगावले यांची भेट घेऊन पक्षाच्या वतीने या तिन्ही तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेचे उमेदवार व पंचायत समितीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिलेला आहे.



पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या बैठका या तिन्ही तालुक्याच्या अध्यक्षांनी घेतलेल्या आहेत व सर्वांना सूचना दिलेल्या आहेत की महायुतीचे जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे उमेदवार भरघोस मतांनी निवडून यावे यासाठी गावोगावी प्रचार करणार आहेत व त्या दृष्टीने त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी गाव बैठका घेण्यास सुरुवात केलेली आहे.

# मोरया फाउंडेशन तर्फे महिलांसाठी संक्रांत महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** मोरया फाउंडेशनच्या वतीने महिलांसाठी संक्रांत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.मीनल हिमने, सौ.संध्या कटमुसरे, सौ. अनुसया शेळके, सौ. लता डायरे उपस्थित होत्या. सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यांनंतर महिलांनी हळदीकुंकवाच्या उपक्रमात सहभागी होत एकमेकींना शुभेच्छा दिल्या. अनेक सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रमात उत्साह भरला. याप्रसंगी महिलांसाठी विविध खेळ व उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या महिलांना मोरया फाउंडेशनच्या संस्थापिका व सचिव सौ. रजनीताई चौहान यांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.



यावेळी निशिगंधा रामटेके, मनीषा भोयर, सुवर्णा रहाटे, चेतना हिंगे, सौ. कांचन भोयर, सौ. अनु शेळके, सौ. गायत्री खंडाळ, सौ. लीना श्रावणकर यांच्यासह संस्थेच्या सर्व महिलांनी सहकार्य केले. निवेदन सौ. माधुरी इत्तडवार यांनी तर मनीषा भोयर यांनी आभार मानले.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारीस मतदान; उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी

**मुंबई** : राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये शनिवार दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत.अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या – पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या – अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

# दशबल पहाडी येथे माघ पौर्णिमा वर्धापन दिनानिमित्त बौद्ध धम्म परिषद संपन्न

## मानसिक शांतता व दु:खातून मुक्ती मिळवण्यासाठी धम्म आचरणात आणने आवश्यक - भिक्खु कुसलामुनी बौद्धगया श्रीकृष्ण देशभ्रतार

**दैनिक युवक आधार**

**भंडारा :** दशबल पहाडी भिक्खू संघ, सितेपार / हत्तीडोई ता. जि. भंडारा यांच्या वतीने माघ पौर्णिमा वर्धापन दिनानिमित्त आयोजित ३२ व्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन दि. ०१ फेब्रुवारी २०२६, रविवार रोजी दशबल पहाडी परिसर, सितेपार / हत्तीडोई येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

बुद्धकालीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या दशबल पहाडी परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा, तसेच संपूर्ण मानवजातीला शांती, समता व करुणेचा संदेश देणाऱ्या महाकारुणिक तथागत गौतम बुद्धांच्या धम्माचा प्रचार व प्रसार व्हावा, या उदात्त उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या धम्म परिषदेत भिक्खूनी संघप्रिया महाथेरी, भिक्खू धम्मज्योती, भदंत सुगतबोधी महाथेरो, भिक्खू शिलरतन, भिक्खू मैत्रय, भिक्खूनी सुप्रज्ञा, भिक्खूनी आम्रपाली तसेच इतर भिक्खू-भिक्खूनी संघ यांनी उपस्थित अनुयायांना धम्मदेशना करत बुद्ध धम्माचा मार्ग, नैतिक जीवनमूल्ये आणि सामाजिक समतेचे महत्त्व विशद केले. प्रत्येक अनुयायांनी धम्म आचरणात आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे. धम्म आचरणात आणले तर मानसिक शांतता आणि खरा आनंद मिळतो, दु:खातून मुक्ती व आत्मज्ञान मिळण्यास मदत होते, माणूस विकारांपासून मुक्त होऊन सदाचारी बनतो. थोडक्यात, धम्म म्हणजे केवळ पूजा-पाठ नसून, कृतीतून सत्य आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारणे होय असा उपदेश भिक्खु कुसलामुनी बौद्ध गया बिहार यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन भिक्खु कुसलामुनी बौद्ध गया बिहार यांच्या अध्यक्षतेखाली रोषणभाऊ जांभुळकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी अमृत बन्सोड यांनी दशबल पहाडीची ऐतिहासिक पार्श्वभूमी सविस्तरपणे मांडून या परिसराच्या प्राचीन वारशाचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास व्ही. एस. चुरहे (कार्यकारी अभियंता, जि. प. भंडारा), प्यारेलालभाऊ वाघमारे (माजी जि. प. सदस्य), प्रा. प्रियदर्शन सोनटक्के, सूर्यभान हुमने, श्रीकृष्ण देशभ्रतार, प्रा. डॉ. शिलवंतकुमार मडामे, शिवदास वहाने, सौ. अलका रंगारी, सौ. वैशाली चव्हाण, डॉ. रतनकुमार गेडाम, सिद्धार्थ गजभिये, दिनेश वासनिक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

समता सैनिक दल च्या वतीने बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान लहान मुला-मुलींनी बुद्ध-भीम गीतांवर सादर केलेल्या उत्स्फूर्त नृत्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले, तर त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. तसेच कलावंत शिवदासजी वहाने यांनी आपल्या सुमधुर गायनातून श्रोत्यांची मने जिंकली. या कार्यक्रमास बहुसंख्य अनुयायी व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन दिनेश कांबळे सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मदनपाल गोस्वामी यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन भिक्खूनी संघप्रिया व डॉ. देवानंद नंदागवळी यांनी केले.







# नागपूर जिल्ह्यात 'मागेल त्याला गटई स्टॉल'

## योजनेसाठी सहायक आयुक्त समाज कल्याण विभागाशी साधा संपर्क

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करण्याची योजना राबविली जाते. ही योजना आता समाज कल्याण आयुक्तांच्या स्तरावर राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या योजनेच्या निकषांतही बदल करण्यात आले असून नागपूर जिल्ह्यात 'मागेल त्याला गटई स्टॉल' या तत्त्वावर पात्र अर्जदारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेत चर्मकार समाजातील पात्र लाभार्थींना महानगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र आणि ग्रामपंचायत क्षेत्रात, १०० टक्के शासकीय अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल उपलब्ध केले जातात. यामुळे त्यांना आपला व्यवसाय सुरू करण्यास किंवा तो वाढविण्याच्या दृष्टीने मदत मिळते. ही योजना २००६-२००७ या वर्षापासून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत होती. याला गती देण्यासाठी ही योजना आता समाज कल्याण आयुक्तालय स्तरावर राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २८ जानेवारी रोजी शासन निर्णय जारी केला आहे.

राज्यात चामड्याच्या वस्तु, पादत्राणे निर्मिती व दुरुस्तीच्या क्षेत्रात अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. त्यांची उपजिवीका ही प्रामुख्याने या व्यवसायावर अवलंबून असून हे व्यावसायिक रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून लोकांना सेवा देतात. या व्यावसायिकांना ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे, त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ही योजना सुरु करण्यात आली.

**योजनेच्या लाभासाठी ही आहे पात्रता**

या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली असून निकषांमध्येही काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गटई स्टॉलचे डिझाईन व आकार पूर्वीप्रमाणेच राहील. लाभार्थींसाठी पात्रतेचे नियम व निकषही निश्चित करण्यात आले आहेत. या योजनेसाठी अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा तसेच अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागात ४० हजार रुपयांऐवजी ८० हजार रुपये व शहरी भागात ५० हजार ऐवजी १ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे (यासाठी तहसिलदाराने निर्गमित केलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील) अथवा अर्जदार दरिद्र्यरेषेखालील असावा. अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महानगरपालिका यांनी त्यास भाडयाने, कराराने, खरेदीने, अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्वमालकीची असावी.

**योजनेसाठी लाभार्थ्यांचा प्राधान्यक्रम**

ही योजना राबविताना लाभार्थ्यांचा प्राधान्यक्रमही निश्चित करण्यात आला आहे. गटई कामगारांपैकी अॅट्रॉसिटी कायद्यानुसार पीडित झालेल्या अनुसूचित जातीच्या व्यक्ती, घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा/परित्यक्त्या महिला, दिव्यांग व्यक्तींना प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठी अर्जदारांना विहित नमूदन्यात अर्ज सादर करावे लागणार आहेत. पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या लाभार्थींची या योजनेसाठी निवड करण्यात येणार आहे. एकदा लाभार्थ्यांना स्टॉलचा लाभ दिल्यानंतर या स्टॉलची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी लाभार्थीकडे राहणार आहे. गटई पत्र्याचे स्टॉल हे एका घरात एकाच व्यक्तीला दिले जातील. स्टॉलचे दुबार वाटप होणार नाही. ग्रामीण भाग, 'क' वर्ग नगरपालिका, 'ब' वर्ग "अ" वर्ग नगरपालिका तसेच महानगरपालिका क्षेत्रात व छावणी क्षेत्रात (कटकमंडळ) सदर गटई स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी गटई कामगारांची राहणार आहे.

एकदा गटई स्टॉलचे वाटप झाल्यानंतर त्या स्टॉलची विक्री करता येणार नाही. तसेच ते भाडे तत्वावर देता येणार नाहीत तसेच स्टॉलचे हस्तांतरणही करता येणार नाही. याबाबत अनियमितता झाल्यास सदर स्टॉल परत घेण्यात येईल. स्टॉलधारकाने स्टॉल कोणत्या जागेत निश्चित केला आहे, हे स्पष्ट होण्यासाठी स्टॉलधारकाचे त्याच्या स्टॉल व जागेसह जिओ टॅगींग छायाचित्राचे रेकॉर्ड सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी अद्ययावत ठेवणे बंधनकारक असल्याचे शासनादेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

योजनेच्या लाभासाठी सहायक आयुक्त समाज कल्याण विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा असे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे.

## लग्न नाही, लूट!; देवगावात तरुणाला नवरीच्या नावाखाली तीन लाखांचा गंडा

### लग्न लावून देण्याचे आमिष; बनावट नोटरीद्वारे विवाहाचा बनाव, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/ निफाड तालुका प्रतिनिधी :** लग्न लावून देण्याचे आमिष दाखवत तरुणाकडून तब्बल तीन लाख रुपये उकळून त्याची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार निफाड तालुक्यातील देवगाव येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, बनावट नोटरीच्या माध्यमातून विवाह झाल्याचा बनाव केल्याचे तपासात समोर आले आहे.



खंडु संपत गव्हाणे (वय २८, व्यवसाय : आर.सी. एफ. फोर्स सिक्युरिटी गार्ड, शाखा अहमदनगर, सध्या रा. देवगाव) यांनी निफाड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार त्यांच्या राहत्या घरी घडला.विलास निवृत्ती भालेराव (रा. पिप्री, ता. येवला), ममता किरण पगारे (रा. ब्रिजलाल नगर, कोपरगाव) व चांदणी मोहन कदम (रा. गांधी नगर, कोपरगाव) या तिघांनी संगनमत करून फिर्यादीस "आम्ही तुझे लग्न चांदणी हिच्याशी लावून देतो" असे आमिष दाखवत विश्वासात घेतले. त्यानंतर आरोपींनी लग्नासाठी खर्च व इतर कारणे सांगून फिर्यादीकडून तीन लाख रुपये रोख स्वरूपात घेतले.

यानंतर आरोपींनी बनावट नोटरी तयार करून देवगाव येथे लग्न झाल्याचा बनाव केला. आरोपी चांदणी हिला फिर्यादीसोबत पाठवून विवाह झाल्याचे नाटक करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात कोणतेही कायदेशीर लग्न न झाल्याचे काही दिवसांतच उघड झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली.

या प्रकरणी संबंधित तिघांविरोधात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम ३१८(४) व ३१८(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या फसवणुकीपासून तरुणांनी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## शेकाप नेते भाई जयंत पाटील यांचा हल्लाबोल; 'निष्ठा विरुद्ध गद्दारीची लढत रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : 'चौल, रेवदंडा, आग्राव,नागाव, वरंडे: शेतकरी कामगार पक्षाचे (शेकाप) नेते भाई जयंत पाटील यांनी महाविकास आघाडीचे रायगड जिल्हा परिषद उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांच्या आग्राव येथील प्रचार सभांमध्ये जोरदार हल्लाबोल केला. "मीच म्हणजे सुरेंद्र म्हात्रे! महाविकास आघाडीला निवडून द्या, ही आघाडी कायम राहील," असा विश्वास भाई जयंत पाटील यांनी मतदारांमध्ये निर्माण केला. विरोधकांच्या '१००-१५० कोटी निधी आणला, त्यात २० टक्के कमिशन जनतेसाठी' या भूलथापांना मात्र शेकडोचा तीव्र विरोध करत, "अशा फसवणुकीला बळी पडू नका!" असे आवाहन केले.या मतदारसंघातील निवडणूक केवळ आकड्यांची किंवा उमेदवारांची लढाई नसून, निष्ठा विरुद्ध गद्दारी, स्थानिक हक्क विरुद्ध दलाली, खरा विकास विरुद्ध खोटी श्रेयलाटा असा थेट संघर्ष ठरल्याचे शेकाप भाई जयंत पाटील यांनी रेवदंडा येथे प्रचार सभेत सांगितले. सुशिक्षित, सुज्ञ तरुण मतदारांमध्ये पक्षांतराच्या गद्दारीबाबत जोरदार संताप असल्याचे नमूद करत, "रेवदंड्यात निष्ठावान



कार्यकर्त्यांना बाजूला सारून दलालीने उमेदवारी मिळवणारे निवडून आल्यावर स्थानिकांचा हक्क कसा राखणार?" असा धडाका लावला.स्थानिक नेत्यांचा संयुक्त संताप चौल येथील माजी सरपंच अजित गुरव म्हणाले, "निवडणुकीत खोट्या श्रेयलाटा घेऊन येतात, पण भ्रष्टाचाराने भरलेल्या कामांमुळे ठेकेदार श्रीमंत होतात आणि जनतेला फक्त आश्वासनं मिळतात!" रेवदंडा भागातील निलेश खोत यांनी स्पष्टपणे सांगितले, "ही गद्दारीची राजकीय संस्कृती थांबवायला हवी. खरा विकास हवा, दलाली नाही!" चौल,नागाव व वरंडे येथील मतदारांमध्येही असाच रोष पेटला असून, शिवसेना (उबाटा) नेते सुरेंद्र म्हात्रे म्हणाले, "जिल्हा परिषदेची कामं ठेकेदारांना देऊन कमिशन भरपूर घेण्यापलीकडे काहीच नाही. स्थानिकांच्या हक्कावर डाका रोखला पाहिजे. "महाविकास आघाडीचे नेते भाई जयंत पाटील यांनी आरोप केला की, काही उमेदवारांनी स्वतःच्या नेत्यांना फसवून दुसऱ्या पक्षात घुसखोरी करून उमेदवारी पदरात पाडली. जनतेचा नारा स्पष्ट आहे – "निष्ठा आणि विकासाला मते, गद्दारी आणि भ्रष्टाचाराला नाही!" प्रचार सभांमध्ये हे प्रश्न विचारले जात असल्याने विरोधकांची पाया खालची वाळू घसरली असल्याचे पाटील यांनी सांगितले. "ही निवडणूक जनतेच्या विश्वासाची खरी कसोटी ठरणार आहे. विरोधकांना गद्दारीच्या आरोपांचे उत्तर द्यावे लागेल," असे त्यांनी ठणकावून सांगितले.प्रचंड उपस्थिती व कार्यकर्त्यांचा उत्साह प्रचार सभांना नागावचे माजी सरपंच नंदू मयेकर,माजी उपसरपंच सदाशिव मोरे, हेमंत गणपत, संतोष बाबू मोरे, निलेश खोत, राहुल गणपत, संदीप खोत, अशोक नाईक, प्रमोद नवखारकर, माजी सरपंच सोनाली मोरे, विजय चौलकर, सुशिल सुर्वे यांसारख्या महाविकास आघाडीच्या प्रचंड कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. मतदार जागे झाले असून, स्थानिक हक्क व खऱ्या विकासासाठी महाविकास आघाडीलाच पाठिंबा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## रामटेकच्या विकासासाठी स्व अजित पवार यांनी केलेले सहकार्य अनमोल - वित्त राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल

■ रामटेक पर्यटन व सांस्कृतिक महोत्सवात पद्मश्री सोनू निगम यांच्या गाण्यांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध

■ रामटेक शहर व पंचक्रोशीतील रसिकांनी दिला उदंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** महाराष्ट्राच्या टोकावर असलेल्या रामटेक येथील पुरातन श्रीराम व इतर मंदिरे, येथील तलावांचे वैभव लक्षात घेवून सांस्कृतिक व पर्यटनाच्या माध्यमातून विकासासाठी स्व अजित पवार यांनी दिलेले योगदान व सहकार्य कायम स्मरणात राहणारे असल्याचे प्रतिपादन



वित्त राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल यांनी केले.

रामटेक येथील नेहरू मैदानावर आयोजित रामटेक पर्यटन व सांस्कृतिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी आयोजित सोनू निगम लाईव्ह कन्सर्ट कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना राज्यमंत्री जैस्वाल यांनी भविष्यात रामटेक येथे एक लाख प्रेक्षक क्षमतेचे भव्य मैदान विकसित करण्यात येणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे अशा मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना अधिक सोयी उपलब्ध होतील, असे ते म्हणाले.

त्यांच्या मनोगतानंतर पद्मश्रीने सन्मानित सुप्रसिद्ध गायक सोनू निगम यांनी एकापेक्षा एक सरस गाणे गात हजारो रसिकांना मंत्रमुग्ध केले. सोनू निगम यांनी आपल्या लोकप्रिय हिंदी गीतांसह मराठी गीतांचीही सादरीकरणे करत स्थानिक प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली. त्यांच्या प्रत्येक गीतावर रसिकांनी भरभरून दाद देत संपूर्ण नेहरू मैदान दुमदुमून गेले.

गीतांच्या तालावर प्रेक्षक झूमताना दिसत होते. महोत्सवाच्या समारोप दि. २ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध गायक सुदेश भोसले यांच्या संगीतमय कार्यक्रमाने होणार आहे.

## वाचनालय हिच खऱ्या अर्थाने ज्ञानपीठ; अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य संजय बच्छाव यांचे संबोधन

**दैनिक युवकआधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी/दीपक गायकवाड** : सनपा सभागृहात बच्छाव यांच्या वतीने नगरपरिषद वाचनालयासाठी आयोजित पुस्तक प्रदान कार्यक्रमात बोलताना बच्छाव यांनी, शहरवासीयांची सांस्कृतिक जडणघडण होण्यासाठी सनपाने व्याख्यानमाला सारखे उपक्रम राबविण्याचे आवाहन केले, तसेच महाराष्ट्रासह गुजरातच्या प्रामुख्याने बडोदे येथील मराठी साहित्य विश्वातील व्यापक सहभागात सनपाच्या वाचनालयाचे योगदान असल्याचे सांगितले. पुस्तकांच्या अनुवादामुळे भाषेची भिंत पारदर्शक होत असल्याचे स्पष्ट करीत, इंग्रजीतून अनुवादित पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी बच्छाव यांनी यापूर्वी शहरात असलेल्या लक्ष्मी थिएटर येथील नाट्यगृहाच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमात नगराध्यक्ष हर्षदा पाटील यांनी बोलताना 'दिल्लीचेही तख्त राखतो, महाराष्ट्र माझा' या परंपरेनुसार साहित्यासह विविध क्षेत्रात मराठी माणसाने देशांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण केल्याचे सांगितले. यावेळी विलास दंडगव्हाळ, कुबेर जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सनपाचे



जनसंपर्क अधिकारी हिरालाल कापडणीस यांनी केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शशिकांत कापडणीस यांनी केले. कार्यक्रमास उपनगराध्यक्ष सुमित वाघ, गटनेते राहुल पाटील, अॅड. मनीषा पवार,नगरसेवक नितीन सोनवणे, हर्षवर्धन सोनवणे, रउफ मुल्ला, अनिल पाकळे, सुनंदा देवरे, मनिषा पाकळे, लता बच्छाव, अलका बोरसे, जयश्री गरुड, तनुजा नांद्रे, संगीता सोनवणे, सुभाष पाटील, सेवानिवृत्त ग्रंथपाल रवींद्र मोरे, दि.श. सोनवणे, दिलीप सोनवणे, प्रदिप सोनवणे, रचना सहाय्यक संकेत बागडे, कर निरीक्षक संजना अहिरे,विद्युत अभियंता मोहन पवार, अंतर्गत लेखापरीक्षक पारस गुजर, सहाय्यक कार्यालय अधीक्षक तेजस्विनी आंधळे,ग्रंथपाल ज्ञानेश्वर खैरनार, वरिष्ठ लिपिक मोहन सोनवणे, अमोल सोनवणे,विशाल वाघ आदींसह नगरपरिषदेचे विभाग प्रमुख कर्मचारी उपस्थित होते.

**पुस्तक प्रदान कार्यक्रमातील पुस्तके**

महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे सचित्र जीवन गाथा, साने गुरुजींची आंतरभारती विचार आणि वाटचाल, मुल्हेरची रासलीला(रास क्रीडा), हे आहे विश्वातील सर्वात विषम युद्ध क्षेत्राच्या भेटीचा सफरनामा सिआचन, महाराजा सयाजीराव गायकवाड

## राज्यातील रोजगार हमी योजनेतील कामगारांचे आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या आऊटसोर्सिंग कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, वेतन व सेवाशर्तींबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. खासगी कंपन्यांच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा करताना नियमांचे पालन होत नसून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे कर्मचारी अन्याय सहन करत तक्रारी आहेत. त्यांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे.




शासनाच्या विविध योजनांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन, सामाजिक सुरक्षा व समान कामासाठी समान वेतन या तत्वांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. काही विभागांमध्ये एका खासगी कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ पुरवठा केला जात असून, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप आहे.कंत्राटी पद्धतीने करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांमध्ये प्रत्यक्षात खासगी मध्यस्थांचा सहभाग वाढल्याने रोजगार हमीचा मूळ उद्देश बाजूला पडत असल्याची टीका होत आहे. अनेक कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ सेवा बजावूनही कायमस्वरूपी दर्जा, वेतनवाढ किंवा मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर आऊटसोर्सिंग पद्धतीचा सखोल आढावा घेऊन स्पष्ट धोरण आखावे, कर्मचाऱ्यांचे हक्क निश्चित करावेत आणि नियमबाह्य नियुक्त्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा या व्यवस्थेमुळे शोषण वाढून प्रशासकीय यंत्रणेत असंतोष निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## धानोरा येथील ग्रामस्थांचे तहसीलदार यांना निवेदन; घरकुलासाठी स्वस्तदरात रेती व मुरूम उपलब्ध करून द्या

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/राळेगाव** - तालुक्यातील धानोरा गावात जवळपास १०० नवीन घरकुल लाभार्थी असून घर बांधकामासाठी लागणारी रेती आमच्या गावालगत वर्धा नदी असूनसुद्धा ६००० ते ७०००रुपये प्रति ब्रास या किमतीने रेती घ्यावी लागत आहे या भावात जर रेती टाकावी लागली तर घरकुलाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. जर आम्हाला आपण आम्हाला स्वस्त दरात रेती उपलब्ध करून दिली तर आम्हाला खर्चात बचत करता येईल व घर बांधकाम लवकर




करता येईल अगोदरच अनुदान प्रलंबित आणि त्यातच मोफत रेतीही नाही,यामुळे घरकुल लाभार्थी अडचणीत सापडले आहेत.दारिद्र्यरेषेखालील तसेच पक्के घर नसणारे,आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थींना विविध योजनेंतर्गतच्या घरकुलाचा लाभ दिला जातो.लाभार्थींना दिलासा महसूल मंत्री यांनी घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास मोफत रेती देण्याची घोषणा केली होती.तसे शासन आदेशही निघाले.अद्यापही याचा लाभ लाभार्थींना मिळाला नाही.दुसरीकडे घरकुल योजनेंतर्गतचे अनुदान अनियमित असून,मोफत रेतीही मिळत नसल्याने घरकुलांचे बांधकाम पूर्ण कसे करावे?असा प्रश्न लाभार्थींमधून उपस्थित होत आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन घरकुलासाठी मोफत रेती उपलब्ध करून द्यावी,अशी मागणी लाभार्थींनी केली आहे,ग्रामस्थांचे घरकुलसाठी स्वस्त दरात रेती व मुरूम उपलब्ध करून देण्यात यावी यासाठी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले यावेळी उपसरपंच विशाल येणोरकर,स्वप्नील गलाट,प्रीतम घिनमीने,विजय मेश्राम,भोजराज जुनघरे,सुनील गेडाम,तुळशीराम गेडाम,आकाश सलाम,विजय चकोले,अविनाश घोडे, मनोहर देवतले,हर्षल घोडे,राजु गुजरकर,जीवन जुमनाके,निलेश वरघणे हजर होते.